CMYK

## चेन्नई सुपर किंग्जचा शेवटच्या चेंडूवर २७ धावांनी विजय

✔ **चेन्नई** : पथीराणा आणि दीपक चाहर यांच्या भेदक माऱ्याच्या जोरावर चेन्नईने दिल्लीचा २७ धावांनी पराभव केलाय. पथीराणा आणि दीपक चाहर यांनी दिल्लीचा अर्धा संघ तंबूत धाडला. चेन्नईने दिलेल्या १६८ दावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीचा संघ १४० धावांपर्यंत मजल मारु शकला. चेन्नईचा १२ सामन्यातील हा सातवा विजय होय.. या विजयासह चेन्नईचे १५ गुण झाले आहेत. तर दिल्लीचा ११ सामन्यातील हा सातवा पराभव होय. दिल्ली ८ गुणांसह तळालाच आहे. त्याशिवाय दिल्लीचे स्पर्धेतील आव्हान जवळपास संपुष्टात आले. चेन्नईने दिलेल्या १६८ धावांचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात अतिशय खराब झाली. कर्णधार डेविड वॉर्नर याला खातेही उघडता आले नाही.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


**आयपीएल सामना क्र.५६**

RAJASTHAN ROYALS Vs KOLKATA Knight Riders

**राजस्थान विरुद्ध कोलकाता**

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : कोलकाता


www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ११ मे २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २२१ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# 'फुल्ल' टेन्शन 'देव' पाण्यात




✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्रात गेल्या दहा महिन्यांपासून उत्सुकता लागून असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे यांच्यातील सत्ता संघर्षावरचा निकाल गुरूवारी जाहीर होणार आहे. या निकालाविषयी वेगवेगळे तर्क-वितर्क समोर आल्याने शिंदे गट 'फुल्ल टेन्शन'मध्ये असून शिंदे गटासह भाजपाच्या नेत्यांनी देव पाण्यात ठेवले आहेत. निकाल आमच्याच बाजूने लागणार, असा विश्वास ठाकरे गटाकडून व्यक्त केला गेला आहे. काही कायदे तज्ञांनी व्यक्त केलेला अनुमान शिंदे गटात खळबळ माजवणारा आहे. निकालानंतर उद्धव ठाकरे हे पुन्हा मुख्यमंत्री होवू शकतात,असे ज्येष्ठ विधिज्ञ उल्हास बापट यांनी म्हटले आहे. निकाल देण्यापूर्वीच शिंदे हे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देतील, असाही तर्क समोर आणला गेला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला आहे. आमचे सरकार पडणार म्हणून जे भाकीत करतायेत, त्यात मुर्खांचा बाजार आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.**

राज्यातील सत्तासंघर्षाबाबत गुरूवारी निकाल येण्याची शक्यता आहे. कारण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी आम्ही दोन प्रकरणांवरील निकाल देणार आहोत, असे सांगितल्यामुळे त्यातील एक प्रकरण हे सत्तासंघर्षाचे असू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. राज्यात मागील वर्षी जून महिन्यात अत्यंत नाट्यमय राजकीय घडामोडी घडल्या आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले. शिवसेनेचे नेते आणि तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षातील ४० आमदारांसह केलेल्या बंडामुळे ठाकरे यांचे सरकार गडगडले आणि शिंदे-फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार सत्तारूढ झाले. मात्र शिवसेनेतील फूट आणि तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेतलेल्या भूमिकेचे प्रकरण थेट सुप्रीम कोर्टात पोहोचले.

### आदित्य राजभवनावर...

सत्तासंघर्षाच्या निकालाला काही तास बाकी असताना आदित्य ठाकरे राजभावनावर गेल्याने राजकीय वर्तुळात स्फोट झाला आहे. आदित्य यांनी राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. या भेटीत उभयतांमध्ये नक्की कोणत्या विषयावर चर्चा झाली, हे अद्याप समोर येऊ शकलेले नाही. दोघांमध्ये जवळपास अर्ध्या तासांहून अधिक काळ चर्चा झाली. चर्चेचा तपशील अद्याप गुलदस्त्यात असला तरी आमदार अपात्रतेच्या आणि सरकारच्या भवितव्याच्या अनुषंगाने या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### फडणवीस म्हणाले, मुर्खांचा बाजार

सत्तासंघर्षाच्या संभाव्य निकालावर चर्चा सुरू असताना फडणवीसांनी लातूर येथे बोलताना खरमरीत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, निर्णयाआधीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजीनामा देतील, असे म्हणणे हा मुर्खांचा बाजार आहे. शिंदे राजीनामा का देतील? त्यांनी काय चूक केली आहे? आम्ही जे केलेय ते सगळे महाराष्ट्राच्या हिताचेच केले आहे.आम्ही पूर्णपणे आशादायी आहोत. एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील. मी तुम्हाला दाव्याने सांगतो की, पुढची निवडणूक एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच होईल.

### तर उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री...

घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी सत्तासंघर्ष प्रकरणावर मोठे विधान केले आहे. निकालानंतर उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होऊ शकतात, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. परिस्थिती पूर्ववत करत आधीच्या मुख्यमंत्र्यांना खुर्चीवर बसवण्याचा निर्णय याआधी सर्वोच्च न्यायालयाने दिला असल्याचेही त्यांनी सांगितले. न्यायालयाने आमदारांच्या निलंबनाचा निर्णय विधानसभा अध्यक्षांवर सोपवला तर कायदा स्वच्छ आहे आणि त्यानुसार तो निर्णय घ्यायचा अधिकार आत्ताच्या अध्यक्षांना असेल. मात्र, न्यायालयाने राज्यपालांनी बहुमत सिद्ध करण्यासाठी जे सत्र बोलावले, ते मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार बोलावलेले नव्हते. तो आदेशच चुकीचा ठरवला तर ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होऊ शकतात. कारण ठाकरेंनी राज्यपालांनी बहुमत सिद्ध करण्यासाठी सत्र बोलावल्यावर राजीनामा दिला होता,याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## जिल्ह्यात पावसाळ्यानंतरच नवे वाळू धोरण

**पर्यावरण विभागाची परवानगी अद्याप नाही; ३० मेपर्यंत ४० ठिकाणी सर्व्हे होणार**

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यात नव्या वाळू धोरणानुसार सहाशे रुपये ब्रास या दराने वाळू मिळणार आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नगर जिल्ह्यात नव्या धोरणानुसार वाळू धोरणाची अंमलबजावणी चालू झाली आहे. मात्र पालकमंत्री असलेल्या सोलापूर जिल्हा अद्याप या निर्णया पासून वंचित राहिला. पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली नसल्याचे कारण पुढे येत आहे.



नव्या वाळू घाटांचे सर्व्हेक्षण होऊन पर्यावरण विभागाची परवानगी येईपर्यंत पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे नव्या धोरणानुसार वाळू पावासाळ्यानंतर मिळण्याची शक्यता आहे. नव्या वाळू घाटांसाठी ३० मेपर्यंत ४० ठिकाणी सर्व्हे होणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली. राज्यात नवे वाळू धोरण लागू झाले असून त्यानुसार सहाशे रुपये ब्रास या दराने सर्वसामान्यांना वाळू मिळणार आहे. नवे वाळू धोरण राबविणार राज्यातील पहिला जिल्हा हा नगर जिल्हा आहे.. सोलापूर जिल्ह्यातही अद्याप नव्या धोरणानुसार वाळू उपसा सुरू झालेला नसून येत्या ३० मेपर्यंत ४० वाळू घाटांचा सर्व्हे होणार आहे. त्यानंतर पर्यावरण विभागाकडून ना हरकत मिळाल्यानंतर वाळू उपसा सुरू होऊ शकतो यामुळे नव्या धोरणानुसार वाळू उपसा सुरू होईपर्यंत पावसाळा येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वाळू उपसा सुरू करण्यासाठी पावसाळा संपण्याची वाट पाहावी लागणार आहे.



शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार सहाशे रुपये ब्रासप्रमाणे एका कुटुंबास एकावेळी ५० मेट्रिक टन म्हणजे जवळपास १२ ब्रास वाळू मिळणार आहे. त्यानंतर पुन्हा वाळू हवी असल्यास एका महिनाभरानंतर पुन्हा मागणी करावी लागणार आहे. नदीपात्रातील वाळू गटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक ही ट्रॅक्टर किंवा सहा टायरच्या टिप्पर वाहनाद्वारेच केला जाणार आहे. हायवा किंवा डंपर यासारख्या जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. वाहतूक करणाऱ्यांना वाहनांना जीपीएस यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. वाळू वाहतूक करणाऱ्यांना वाहनांचा दर्शनी भाग हा पिवळ्या रंगाचा असणार आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल बांधणाऱ्या तसेच दारिद्र्यरेषेतील लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत वाळू देण्याचा निर्णय नवीन वाळू धोरणात घेण्यात आला आहे.

## शरद पवारांच्या निमंत्रणावरून तिघांचे शिष्टमंडळ मुंबईला

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोलापूर लोकसभा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या शहरातील शहर उत्तर, शहर मध्य व सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाबरोबरच आगामी महापालिका निवडणुकीच्यादृष्टीने सध्याच्या राजकारणाबद्दल चाचपणी करण्यासाठी राष्ट्रवादीत दाखल झालेल्या तिघांच्या शिष्टमंडळाला मुंबईला बोलावले आहे.

माजी महापौर महेश कोठे, ॲड. यू. एन. बेरिया तसेच सुधीर



खरटमल यांचा या शिष्टमंडळात समावेश असून हे तिघेही बुधवारी रात्री मुंबईला रवाना झाले. आज गुरूवारी मुंबईत शरद पवार हे आगामी राजकारणाच्या अनुषंगाने विविध विषयावर या तिघांशी चर्चा करणार आहेत. शरद पवार यांनी नुकताच सोलापूर दौरा केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चैतन्य पसरले आहे.

पवार यांनी या सोलापूर दौऱ्यात माजी महापौर कोठे, ॲड.बेरिया आणि खरटमल यांच्याशी अर्धा तास चर्चा केली होती. त्यानंतर अधिक चर्चेसाठी या तिघांनाही मुंबईला येण्याचे त्याचवेळी निमंत्रण दिले होते. त्यानुसार हे तिघेही मुंबईला गेले. मध्यंतरी आमदार रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाची अदलाबदल होऊन राष्ट्रवादी काँग्रेसला ही जागा मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यावर आमदार प्रणिती शिंदे यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर ही चर्चा थांबली होती. आता पुन्हा सोलापूर लोकसभा राष्ट्रवादीकडे घेण्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मात्र शरद पवार यांनी हा विषय महाविकास आघाडीच्या बैठकीतच होईल, असे स्पष्ट केले असले तरी गुरुवारच्या मुंबईतील बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या राष्ट्रवादीमध्ये मूळ पदाधिकाऱ्यांपेक्षा माजी महापौर कोठे, ॲड.बेरिया आणि खरटमल हे अधिक सक्रिय आहेत. त्यामुळे काँग्रेसमधून आलेल्या या तिघांना ताकद देऊन सोलापूर शहरात राष्ट्रवादी भक्कम करण्याचा शरद पवार यांचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. पवार हे आगामी सर्व निवडणुकांतील जबाबदारी कोठे, ॲड.बेरिया आणि खरटमल यांच्या खांद्यावरच सोपविणार असल्याची चर्चा आहे.

### जागेच्या वादातून मारहाण पती-पत्नी जखमी

✔ **सोलापूर** : जागेच्या वादातून केलेल्या मारहाणी पती-पत्नी जखमी झाले. ही घटना अक्कलकोट येथील एमआयडीसी परिसरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. विजयकुमार चंद्रकांत रामपुरे (वय ३८ ) आणि त्यांची पत्नी नागिणी रामपुरे (वय ३०) अशी जखमींची नावे आहेत. त्यांचा भाऊ लोकेश, वडील चंद्रकांत रामपुरे आणि काशीबाई रामपुरे या तिघांनी मिळून त्यांना मारहाण केली.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर दुष्कर्म; एकावर गुन्हा

✔ **सुराज्य/बार्शी** : पहिले लग्न झाले असताना पीडीतेपासून ते लपवून ठेवले. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार दुष्कर्म केले. नंतर लग्नाबाबत वेळकाढूपणा करून शेवटी लग्नास नकार दिल्यानंतर पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून बार्शी शहर पोलिसांत दुष्कर्माचा गुन्हा दाखल झाला आहे.

पंकज तुकाराम शिंदे (रा. सुतार नेट, कसबा पेठ, बार्शी) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. डिसेंबर २०१५ ते जुलै २०२२ च्या दरम्यान ही दुष्कर्माची घटना घडली. दरम्यान, पोलिसांनी संशयितास अटक केली असून न्यायालयात हजर केल्यानंतर ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पिडितेस आई-वडिलांनी शिक्षणासाठी बार्शी येथे आजीकडे ठेवल्यानंतर तिची आत्याही तेथेच जवळ राहत होती. यावेळी तिची पंकज बरोबर सन १९९८ साली ओळख झाली. पुढे ओळखीचे



रूपांतर प्रेमात झाले. डिसेंबर २०१५ मध्ये आजीच्या घरी कोणी नसताना दुष्कर्म केले.मार्च २०१६ मध्ये पिडितेस ती गरोदर असल्याचे समजल्यानंतर तिने पंकज कडे लग्न करण्याचा हट्ट धरला. त्यावेळी त्याने कारण सांगून लग्नाला टाळाटाळ केली. ऑक्टोबर २०१६ मध्ये पीडितेने एका मुलास जन्म दिला. त्यावेळी तिने लग्नाबाबत विचारले असता मूल थोडे मोठे झाल्यानंतर लग्न करू, असे म्हणून वेळकाढूपणा करत लग्न न करता पीडीतेसोबत दुष्कर्म करू लागला. २४ जुलै २०२२ रोजी ते पंकजकडे गेले. तिने वडिलांसमक्ष त्यास लग्नाबाबत विचारणा केली असता त्याने तिच्यासोबत लग्न करू शकत नसल्याचे स्पष्ट सांगितले. पिडितेस मारहाण केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्या राज्याचा काय अंदाज लागतोय का?

| कल्याण |
|---|
| --------- |

| मेन बाजार |
|---|
| --------- |


## महसूल भवनाच्या उद्घाटनाला अखेर मुहूर्त मिळाला

### १६ मे रोजी उपमुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन

✔ सुराज्य/सोलापूर

**अनेक वर्षांपासून रखडलेल्या सात रस्ता परिसरातील शासकीय दूध डेअरीच्या जागेतील बहुचर्चित महसूल भवन अर्थात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उद्घाटनाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. मंगळवार, १६ मे रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. याचवेळी महापालिका इंद्रभुवनच्या इमारतीच्या नूतनीकरण इमारतीचे लोकार्पण सोहळा यावेळी होणार आहे. बुधवारी प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजनाची बैठक घेतली.**

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीस प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे



यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांच्यासह इतर विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाशी निगडीत सर्वच विभाग एकाच ठिकाणी आणण्याच्या उद्देशाने २००८ मध्ये तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व तत्कालीन जिल्हाधिकारी जगदीश पाटील यांच्या पाठपुराव्याने सात रस्ता परिसरातील शासकीय दूध डेअरीच्या जागेत नवीन महसूल भवन उभारणीचा निर्णय झाला. त्याचे भूमिपूजनही त्याचवेळी झाले. परंतु नंतरच्या काळात निधीअभावी अनेक वर्षे बांधकाम रखडले. मोहिते-पाटील यांच्यानंतर प्रा.लक्ष्मण ढोबळे, ॲड. दिलीप सोपल, विजयकुमार देशमुख, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसेपाटील, दत्तात्रय भरणे आणि आता राधाकृष्ण विखे-पाटील असे आठ पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी पाटील यांच्यानंतर प्रवीण गेडाम, गोकूळ मवारे, तुकाराम मुंढे, रणजितकुमार, राजेंद्र भोसले आणि आता मिलिंद शंभरकर असे सात जिल्हाधिकारी झाले. या सर्वांच्या काळात महसूल भवनचे काम सुरूच होते. जिल्हाधिकारी भोसले आणि आत्ताचे शंभरकर यांच्या काळात या कामाला गती मिळाली. बांधकामाबरोबरच फर्निचरसाठीही निधी उपलब्ध झाला आणि काम पूर्ण झाले. सुरुवातीला पाच मजली इमारतीचा प्रस्ताव होता. परंतु निधीच्या अडचणीमुळे दोन मजलीच इमारत



उभी राहिली. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागाऐवजी आता केवळ चार ते पाच विभागच तेथे स्थलांतर होण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, महसूल उपजिल्हाधिकारी यांची कार्यालये सुरुवातीला तेथे स्थलांतरित होतील.

इतर कार्यालये सध्याच्या जुन्या इमारतीतच राहणार आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांबरोबरच नागरिकांचीही गैरसोय होणार आहे. मात्र गेल्या दीड-दोन वर्षांपासून रखडलेल्या या नव्या महसूल भवन इमारतीच्या उद्घाटनाचा मार्ग आता मोकळा झाला असून त्याचा मुहूर्तही ठरला आहे. महसूल भवनच्या उद्घाटनाबरोबरच महापालिकेने नूतनीकरण केलेल्या इंद्रभुवन इमारतीचे उद्घाटनही याचठिकाणी ऑनलाइन पद्धतीने कळ दाबून केले जाणार आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याबरोबरच महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची यावेळी उपस्थिती राहणार आहे.

CMYK

## बदलाचे वारे...

उभ्या जगात लोकशाहीची जननी म्हणून ज्या देशाकडे पाहिले जाते,त्या इंग्लडमध्ये राजकीय अस्थिरता उत्पन्न होते की काय? असेच चित्र समोर येत आहे. इंग्लंडमध्ये गत आठवड्याच्या अखेरीस राजे चार्ल्स तिसरे यांच्या राज्याभिषेक सोहळ्याची लगबग आणि उत्साह होता. बहुतांश जगाचे लक्ष या सोहळ्याकडे लागलेले होते, त्यामुळे त्याच देशातील आणखी एका महत्त्वाच्या घडामोडीची दखल प्रसारमाध्यमांनी फारशी घेतली नाही. त्या देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल शुक्रवारी प्रसृत झाले. या निवडणुकांमध्येही प्रामुख्याने हुजूर (कन्झर्वेटिव्ह) आणि मजूर (लेबर) या दोन प्रमुख पक्षांमध्ये लढत होती. आकडेवारीवरून तरी तीत मजूर पक्षाने जोरदार विजय मिळवल्याचेच दिसून आले. त्यांनी ७१ नगरपालिका जिंकल्या असून, त्यांचे २ हजार ६७४ उमेदवार विजयी झाले. याउलट ३३ नगरपालिकांमध्ये हुजूर पक्षाची सत्ता आली आणि त्यांचे २हजार २९६ सदस्य दिसून आले. गेल्या वेळच्या तुलनेत मजूर पक्षाने २२ पालिका आणि ५३६ जागा अधिक जिंकल्या. याउलट ४८ पालिका आणि हजारहून अधिक जागा हुजूर पक्षाने गमावल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतून राष्ट्रीय निवडणुकांचा कल ठरविण्याविषयीच्या सिद्धान्ताचा प्रतिवाद होत असतोच. परंतु विशेषत: सध्याच्या परिस्थितीत ब्रिटिश पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या हुजूर सरकारचा लेखाजोखा मांडण्यास माध्यमे आणि विश्लेषकांनी सुरुवात केली आहे आणि या परीक्षेतला पहिला पेपर म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका. या निवडणुकांमध्ये आमच्या काही बालेकिल्ल्यांमध्ये धक्का बसेल असे भाकीत हुजूर पक्षाच्या धुरीणांनीच वर्तवले होते. त्यांच्या अंदाजापेक्षाही अधिक वाईट कामगिरी या पक्षाची झालेली दिसते. २०१९मध्ये बोरिस जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली आणि 'ब्रेग्झिट'च्या धुंदीवर स्वार होऊन हुजूर पक्षाने पूर्ण बहुमताने सत्ता राखली. त्या वेळी विरोधी मजूर पक्षाचे भवितव्य किती अंधारे आहे याचे दाखले दिले जात होते. प्रत्यक्षात मोठे बहुमत असूनही आत्मकेंद्री आणि कुचकामी नेतृत्वाने - पक्षी बोरिस जॉन्सन यांनी - हुजूर पक्षाचा पायाच डळमळीत करून सोडला आहे. करोना, युक्रेन



युद्ध आणि या दोन घटकांबरोबरच कल्पनाशून्य नेत्यांमुळे खिळखिळी बनलेली अर्थव्यवस्था अशा तिहेरी संकटांच्या वावटळीत हुजूर पक्षाची नाव पुन्हा एकदा सत्ताकिनाऱ्यापर्यंत नेण्याची जवळपास अशक्यप्राय जबाबदारी सुनक यांना पार पाडायची आहे. सुनक हे जॉन्सन यांच्यासारखे बेफिकिर नाहीत किंवा लिझ ट्रस यांच्यासारखे बेतास बुद्धी नाहीत, ही त्यांची जमेची बाजू. पण तेवढीच. कारण आव्हानांचा डोंगर अजस्र आहे. तब्बल १३ वर्षांच्या हुजूर पक्षाच्या राजवटीनंतर ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. या सगळ्या गोंधळाला प्राधान्याने कारणीभूत जॉन्सन असले, तरी उजव्या विचारसरणीचे जॉन्सन समर्थक, 'जॉन्सन यांना पद सोडायला लावणे ही हुजूर पक्षाची सर्वात मोठी चूक ठरली,' असे कथानक सुनक पंतप्रधान बनल्यापासूनच रचू लागले होते. या मंडळींना स्थानिक निवडणुकांमध्ये त्यांच्याच पक्षाच्या मोठ्या पराभवानंतर बळ मिळणार आहे. पक्षांतर्गत होत असलेला विरोध हे सुनक यांच्यापुढील प्रमुख आव्हान आहे. ब्रिटनच्या सद्य:स्थितीस सुनक जबाबदार नसतीलही. पण तिचे पालकत्व नि:संशय सुनक यांनाच स्वीकारावे लागेल,असे तिथले राजकीय विचारवंत सांगतात. ब्रेग्झिटमुळे ओढवून घेतलेला व्यापारी विभक्तवास फळण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. तशात करोनाच्या उथळ हाताळणीमुळे आणि करकपातीच्या आर्थिक वेडेपणामुळे या देशात सार्वत्रिक असंतोष आहे. सार्वजनिक सेवा खिळखिळ्या बनल्या आहेत. 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस'सारखी प्रतिष्ठित आरोग्य सेवा भिकेला लागली आहे. शिक्षक, सरकारी डॉक्टर, रेल्वेचालक, कामगार या सगळ्यांनाच वेतनवाढ हवी आहे. ऊर्जा आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर कडाडल्यामुळे वेतनतुटवडा सतावतो आहे. पण यांना वेतनवाढ द्यायची कुठून, हा सुनक सरकारसमोर तिढा आहे. सरकारी उत्पन्नाचे स्रोतच अजून पुनरुज्जीवित झालेले नाहीत. तशात निर्वासितांचे थवे अनेक किनाऱ्यांवर धडकू लागल्यामुळे 'आमचा विचार आधी करा, बाहेरच्यांचा नंतर' ही भावना राजकीयदृष्ट्या परम संवेदनशील बनलेली आहे. तिला विरोध केल्यास राजकीय नुकसान आणि निर्वासितांना स्वीकारून आर्थिक तरतूद करण्याची कुवत नाही अशी कोंडी आहे. बेजबाबदार आर्थिक धोरणांमुळे ब्रिटिश पौंड अमेरिकी डॉलरच्या तुलनेत १९८५ मधील नीचांकी पातळीवर घसरला आहे.या सर्व प्रश्नांवर तातडीची आणि नेमकी उत्तरे कोणालाच शोधता येणार नाहीत. परंतु ती सुनक यांनी शोधावी लागतील सुनक यांच्या दृष्टीने पक्षांतर्गत आव्हान सर्वात मोठे आहे.

कृषी

# फसलेली शेतकरी अवस्था!

*आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी जे स्व. शरद जोशी साहेबांनी तत्त्वज्ञान , धोरणे व विचारसरणी मांडली, ती आज तरी जगाच्या पाठीवर न विसरणारी किमया आहे. परंतु ही किमया साध्य करण्यासाठी राजकारणाची जोड हवी आहे. कारण शेतकऱ्यांची आर्थिक धोरणे हे संसद मध्ये कायद्याच्या चाकोरीत फसलेली आहे, आणि ती चाकोरी तोडण्यासाठी राजकीय क्षेत्राची गरज आहे. कारण प्रत्येक व्यवस्थेचा मूलभूत अधिकार जरी जनतेला दिला असेल तरी, कायदे दुरुस्त करणे ही बाब आमदार खासदारां वर आधारीत आहे.*

ती बाब जनतेच्या लक्षात येण्यासाठी बराच काळ जात असतो. शेतकऱ्यांची आर्थिक समस्या, त्यांना लूटलेली व्यवस्था आणि त्यांच्यावर होत असलेलं अधिराज्य ही बाब सामान्य माणसाच्या कल्पनेच्या पलीकडील आहे. सामान्य शेतकऱ्याला जर या देशाचा आर्थिक धोरण समजलं असतं तर त्यांनी शेती कशाला केली असती? आणि त्याला ते समजू नये यासाठी तर त्याला जास्तीत जास्त धार्मिक व्यवस्थेत गुंतवल्या जात आहे. शेतकऱ्यांचे शोषण होऊन या देशात औद्योगिक क्रांती व्हावी हे तर मुळात धोरणच राबविले जात आहे. आणि ती बाब आजच्या राजकीय पक्षांना काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी यांना ती तोडायची नाही.ही अशीच चालत असलेल्या व्यवस्थेवर तर त्यांना राज्य करायचे आहे.

नुसतं छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत तुकाराम महाराज यांची नाव घेऊनच बोंबा ठोकायचे असून, राज्य करायचे आहे. आणि हा संपूर्ण समाज भीम जयंती, शिवजयंती, रामनवमी, हनुमान जयंती, भागवत सप्ताह, अशा अनेक धार्मिक क्षेत्रात गुंतून ठेवायचा आहे. मग शेतकरी सुखी करणे शेतकऱ्यांची बाजू उचलणे व शेतकऱ्यांना न्याय देणे ही बाब साधारण आजच्या राजकारणात दुरापास्त दिसत आहे.

चिखलफेक करून घाणेरडे कपडे घालण्यापेक्षा, राजकारणाची व्यवस्था, तत्त्वज्ञाना प्रमाणे स्वच्छ करणे ही बाब अतिशय गंभीर आहे, पण ते काही फार कठींण सुद्धा नाही. जनतेनी आणि निवडून आलेल्या नेत्यांनी जर या बाबींची पूर्तता केली तर ते शक्य सुद्धा होऊ शकते. ज्यां महापुरुषांनी तत्त्वज्ञानाचे धडे मांडले ते समाज सुधारक म्हणून गणल्या गेलेत. ते राजकारणात अपयशी झालेत. तत्त्वज्ञान हे गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मांडल्या जाते, आणि राजकारण हे गुलामी स्वीकारण्यासाठी मांडल्या जाते. राजकारणाची भाषा सामान्य व्यक्तींना समजण्यासाठी अतिशय सोपी आणि सरळ असते. आणि तत्वज्ञानाची भाषा




कठोर,गंभीर, संघर्षवादी, आणि मनाला हेलकावे देणारी असते. मात्र राजकारण करताना फवारे उडविले जाते, तत्त्वज्ञानात मात्र ध्येयनिष्टता असते. आणि ती ध्येयनिष्ठा साकार होण्यासाठी बराच काळ, वाट पाहावी लागेलं.

देशपातळीवर राज्य पातळीवर ,ज्या घोषणा होतात , ते फक्त समाजात सोडलेले फुगे असतात. कारण तत्त्वज्ञान समजून घेणारी देशात, राज्यात, शहरात, आणि गावात माणसे किती असू शकतात? बुद्धीच्या माध्यमातून, तत्त्वज्ञान समजून घेताना लोकसंख्येचा आणि मतदारांचा विचार केला तर, तत्त्वज्ञान समजून घेणारी माणसं एक टक्का सुद्धा नाहीत . मग राजकारण एक टक्का लोकांच्या भरोशावर होणार काय ? मग सत्ता हातात कशी येईल, हा राजकिय पक्षांचा प्रश्न असतो. म्हणून काही योजना राबविल्या जातात, काही साकार होतात आणि काही योजनांचे फक्त फटाके फुटतात. काहीच योजना ह्या समाजाच्या उपयोगी अस्तित्वात येण्यासारखे असतात. राजकारण करण्या साठी सर्व व्यापक विचाराची घडामोड असावी लागते, केवळ तत्त्वज्ञान घेऊन राजकारण करणे आजच्या परिस्थितीत दूरापास्त आहे. फक्त जातीच्या भरोशावर केलेले राजकारण थोडेफार राजकारणाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत ते फक्त समाजात फवारे उडविणे आहे. कारण या देशातील आर्थिक धोरणाची बाजू ही सामान्य माणसाला कळत नाही, त्यामुळे ही विसंगती आहे.

तेलंगणा राज्य सरकार सुद्धा काही अंशी फवारे उडवत असेल , तर त्यात नवल काहीच नाही. प्रत्येकच राज्यात थोड्याफार चुका असू शकतात.सर्व यंत्रणा शेवटच्या क्षणापर्यंत राबविणे ही फार कठीण बाब आहे. त्यासाठी पूर्ण मंत्रिमंडळ आणि योजना राबविणारे अधिकारी त्या व्यवस्थेसी प्रामाणिक असायला पाहिजे. तेव्हाच ती पूर्तता होते. कोणतेही राज्याचा एक मुख्यमंत्री या विशाल महाकाय व्यवस्थेत कुठे ना कुठे कमी पडतो. त्यासाठीच तर योजना राबविणारी व्यवस्था कार्यशील असणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असेल तर नुसतं तत्त्वज्ञान मांडून आतापर्यंत चाळीस वर्षात सोडवल्या गेले नाहीत, तर कृतीतून दबाव तयार करावा लागला, त्याचा हा परिणाम आहे. आणि कोणताही दबाव हा कायम टिकवला जात नाही. कायम दबाव टिकून राहण्यासाठी राजकारणाची जोड लागते आणि राजकारणासाठी काही अंशी तरी खर खोटं योजना राबवून राजकारणात जिंकण्याची ती तयारी असते. तीच आजची पद्धत आहे. शंभर टक्के तत्त्वज्ञान उगाळून सध्या तरी राजकारण होत नाही, कारण त्यासाठी तेवढी साक्षरता हवी आहे .

तरीपण या व्यवस्थेत ८० टक्के प्रामाणिक पणा असावा ही जनतेची इच्छा असते. शेतकरी प्रश्न सोडविणे ही आता राजकीय बाब बनली आहे. आणि त्यासाठी शेतकरी विचार सोडवंनाऱ्या पक्षाची जशी वाट मिळत असेल, त्या वाटेने सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी जाणे हे गरजेचं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी व आंध्रातील चंद्राबाबू नायडू सरकार यांच्याशी संघर्ष करून तेलंगणा मॉडेल के. चंद्रशेखरराव यांनी नवीन राज्य तयार केले. ते कदाचित काही अंशी यशस्वी असेल, काही अंशी ते कमी सुद्धा पडले असतील, तर तो प्रत्येकाच्या राजनीतीचा भाग आहे.

आजच्या परिस्थितीत राजनीति करून शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी, संसद मध्ये पोहोचण्यासाठी, काही तत्त्वज्ञान मांडून व काही फुगारे सोडूनच राजनीति होत आहे. तत्त्वज्ञानाचा गाभा समजून मतदान करणारी मंडळी तयार होण्यासाठी अजून बराच काळ शिल्लक आहे ,अन् त्यासाठी के. चंद्रशेखर राव यांचा भारत राष्ट्र समिती पक्ष जर शेतकरी समस्या घेऊन, व योग्य मांडणी असेल अन् समाजासमोर येत असेल तर शेतकऱ्यांनी विचार करायला काही हरकत नाही! कारण योग्य तत्त्वज्ञान, व देशातील आर्थिक धोरणे समजून घेणारी , जनता अजून तरी पूर्णपणे साक्षर नाही. ज्या काँग्रेस पक्षांनी गरिबी वाढवली त्यांनीच निवडणुका जिंकासाठी गरीबी हटाविण्याचे फुगारे सोडले. मात्र गरीबी हटविली गेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. आता तत्त्वज्ञान सांगून समाज प्रबोधनकार व्हाय चे, कि राजनीति च्या माध्यमातून सत्ताधीश होऊन शेतकरी प्रश्न सोडवायचे, या गंभीर बाबींवर नक्कीच विचार करावा लागेल . शासनाच्या व कायद्याच्या नजरेत शेतमालाला भाव मागणारा शेतकरी आता पुढे गुन्हेगार होऊ नये व त्याची बिकट अवस्था होऊ नये, त्यासाठी योग्य पद्धतीचे आमदार, खासदार जनतेला निवडून द्यावी लागतील, तरच या देशात समृद्धी नांदेल व योग्य दिशेने वाटचाल होईल. एवढीच अपेक्षा...

जय हिंद, जय बळीराजा, जय गुरु.

**- धनंजय पाटील काकडे.**

टुडेज् ब्लॉग

# हे पुस्तक मुलांना वाचून दाखवा...

**माणसाचं मन अत्यंत संकुचित असू शकतं किंवा ते अतिशय विशाल होऊन जगाला कवेत घेऊ शकतं. 'सागर रेड्डी - नाम तो सुना होगा' हे पुस्तक नुकतेच वाचले. हे पुस्तक वाचणारी कोणीही व्यक्ती स्वार्थाच्या चिखलात पूर्वीसारखी लोळत राहू शकत नाही. लेखिका सुनीता तांबे यांनी सागरची ही कथा अत्यंत नितळपणे सांगितली आहे. वाचकाचे मन सागराइतके अथांग करण्याची किमया हे पुस्तक करते.**

---

भारतातील अनाथाश्रम मुला-मुलींना वयाच्या अठरा वर्षांपर्यंत सांभाळतात आणि त्यानंतर या अनाथ मुलांना चक्क वाऱ्यावर हाकलून देतात. ही कोणती व्यवस्था आपण निर्माण केली आहे? सागर रेड्डी या तरुणालाही असेच अठराव्या वर्षी हाकलून देण्यात आले. त्यानंतर त्याचे काय झाले? देशभरात सागरने काय काम उभे केले? याची जबरदस्त प्रेरक हकीकत या पुस्तकात आहे. हे पुस्तक प्रत्येक जिवंत आईबापाने आपल्या मुलांना द्यावे. मुलांना मराठी वाचता येत नसेल तर स्वतः वाचून दाखवावे.

आपल्या आजूबाजूला असंख्य लोक कुत्र्यापेक्षाही वाईट जगत असताना फक्त आपल्याच ताटात सगळे तूपलोणीसाखर ओढण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे लोक शेवटी दुःखातच पडतात. पण हे आपल्याला मरेपर्यंत लक्षात येत नाही. सागरने स्वत:चा बुक केलेला फ्लॅट विकून निराधार युवकांसाठी दोन फ्लॅट भाड्याने घेतले त्याच क्षणी त्याला आनंदाचा झरा गवसला. आपल्या कुवतीनुसार इतरांचे दुःख दूर करणे हाच खरा सुखाचा मार्ग आहे. पण हे अपवादाने, अपघाताने एखाद्या सागरला कळते. तसे संस्कार सर्वांवर लहानपणापासूनच का होऊ नयेत? येथे आपण कमी पडलो आहोत.

आजही असंख्य नीच लोक घरातल्या घरात एकमेकांना अतोनात छळतात. निराधार लहान मुले आणि स्त्रियांना मरणाचे राबवून घेतात. अतिशय क्रूर अत्याचार करतात. ही प्रगती कशी म्हणावी? माणसाच्या मनाचा कोतेपणा घालवून संवेदना जागवणारे हे पुस्तक सुनिता तांबे यांनी मोठ्या कष्टाने लिहिले आहे. जगातील सर्व भाषांमध्ये या पुस्तकाची भाषांतरे व्हावीत.

हे पुस्तक वाचून जगभरातील तरुण रक्ताचे लोक स्वार्थापलीकडे जाऊन निराधारांचे आधार होतील आणि माणसांचा छळ थांबवतील हीच आशा आहे.

**- विनोद जैतमहाल ।**





**पुस्तकाचे नाव- 'सागर रेड्डी - नाम तो सुना होगा'**
**लेखिका- सुनिता तांबे**
**अक्षयभारती प्रकाशन, मुंबई**

अध्यात्म

## पूर्णवादाचा ध्यानयोग

पूर्णवाद म्हटल्यावर त्रिकांडात्मक साधनसमुच्चयच घ्यावा लागतो. केवलाद्वैतवाद्यांना केवळ ज्ञान हेच साधन किंवा वैष्णवाचार्यांना भक्ती (नवविधा) हे साधन घेऊन चालावे लागते. पण वेद, उपनिषदे, गीता या सर्व ठिकाणी त्रिकांडात्मक साधनेचा स्वीकार आहे. पूर्णवाद म्हटला की- कर्मयोग, ज्ञानयोग व ध्यानयोग म्हणजे उपासना. यातला ध्यानयोग म्हणजे उपासना मार्ग.

ते ध्यानयोगानुगता अपश्यन् देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम्.. -श्वेताश्वतर उपनिषद अध्याय एक, श्लोक तीन. ध्यानयोगाने शांतचित्त ऋषी ध्यानात जगताचे कारण अशी देवात्मशक्तीच पाहते झाले. पूर्णपुरुषाचे ठिकाणी त्याचे ज्ञान, बल, क्रिया या ज्या गोष्टी स्वाभाविक दिसतात, त्यांनाच त्याची शक्ती म्हणतात. तेव्हा शक्ती आणि तो भिन्न नाही. वैदिक धर्मानुसार ईश्वराचे नित्यअर्चन विधीत ज्याला आपण नित्य पूजा असे म्हणतो, त्या पूजा करणाऱ्याला पुरुषसूक्तातील सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात..'



या मंत्राचा ध्यानासाठी उपयोग करतात. ध्यान म्हणजे पूर्णतः भगवंतमूर्ती. तत् वा सत् वस्तू डोळ्याने पाहणे, मन:चक्षूसमोर आणणे. ज्या वस्तूचा आपण सतत निजध्यास ठेवायचा, त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान व यथार्थ रूपच माहीत हवे. या मार्गाने प्रथम ईश्वराचे पूजन कर्ममार्गाने करून मग त्याच्या स्वरूपाची म्हणजे ज्ञानमार्गाची जाणीव धरून शेवटी भक्ती व उपासना मार्गाने त्याला आवाहन करावयाचे असते. इथे क्षमेचा मंत्रही म्हणण्याचा प्रघात आहे.

पूर्णपुरुष परमेश्वराची तीन रूपे- विष्णुरूप, शिवरूप, विश्वरूप अशी असल्यामुळे त्या प्रत्येक रूपात दुसऱ्या दोन रूपांची साक्ष, अशी तीन-तीन रूपे म्हणजे एकूण नऊ रूपे होतात. जसे परब्रह्माच्या ठिकाणी, म्हणजे शिवरूपाच्या ठिकाणी सत्, चित्, आनंद ही त्रयी. विष्णुतत्त्वाच्या ठिकाणी वासना, भोग, तृप्ती आणि विश्वतत्त्वाच्या ठायी त्रिगुणात्मक उत्पत्ती, स्थिती आणि लय हे होत. विश्वाचा पूर्णाशी स्वरूपसंबंध असल्याने उत्पत्ती-स्थिती-लय विश्वाची प्रकृती म्हटली जाते. म्हणजे विश्व नव्हे तर विश्वांतर्गत कार्य. ते अखंड असल्याने गम' या धातूपासून उत्पन्न होणारा जगत्' हा शब्द या कार्याच्या गतीच्या स्थितीला लावतात. जगत्' हे प्रवाहरूप आहे. हे ज्ञान विज्ञानाने सहज निश्चित होते. केवलसत्य पूर्णपुरुष हा त्रिरूपाचा पुरुष असल्याने जगातील सर्व गोष्टी त्रयीने युक्त आहेत. तेव्हा जीवनाची इतिकर्तव्यता ज्ञान, कर्म, उपासना या त्रयीच्या ध्यानयोगाने प्राप्त होते..

**- विद्यासागर डॉ. विष्णूमहाराज पारनेरकर**

जनमानस

## देशातील लिथियमचे साठे हरित अर्थव्यवस्थेसाठी पोषक

राजस्थानच्या देगाना, नागौरमध्ये सापडलेला लिथियमचा साठा हा जम्मू काश्मीरमध्ये सापडलेल्या अंदाजे ५९ लाख टणांएव्हढ्या लिथियमच्या साठ्यापेक्षा मोठा तसाच तो चीनमधील लिथियमच्या साठयापेक्षा जास्त असू शकतो असा दावा जिओलोजीकल सर्व्हे ऑफ इंडियाने केला. सध्या भारतात चीनसह सहा देशांतून लिथियम आयात केले जाते. भारतातील साठा देशाची ८० टक्के गरज भागऊ शकतो त्यामुळे चीन व इतर देशांवरील अवलंबित्व कमी होईल. लिथियम हा जगातील सर्वात हलका व पाण्यावर तरंगू शकणाऱ्या या नॉन फेरस धातूचा उपयोग



घड्याळे, मोबाईल्स, लॅपटॉप्स आणि इलेक्ट्रिकल वाहनांच्या बॅटरीज चार्ज करण्यासाठी केला जातो. देशाच्या हरितव्यवस्थेला सहाय्यभूत ठरणारा हा धातू देशाची अर्थव्यवस्था अधिक समृद्ध करू शकतो असा तज्ज्ञांचा कयास आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात टनाला सुमारे ५७.३६ लाख रुपये किंमत असणारा लिथियम धातू आयात न केल्यामुळे देशाच्या विदेशी चलनाची बचत होईल शिवाय अवलंबित्व कमी झाल्यामुळे चीनला नव्या आयातदार देशांचा शोध घ्यावा लागेल. पांढरे सोने म्हणून ओळखला जाणारा हा धातू भारताला आखाती देशांप्रमाणे संपन्न करू शकतो.

**- स्नेहा राज,गोरेगांव.**

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन

*आज ११ मे आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रदान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या.*

अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला.

ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा




लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली.

कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रदान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## पश्चिम बंगालचे डॉ. अरविंद डागांची स्वेरीला सदिच्छा भेट

**पंढरपूर** : शेती उत्पन्नात अधिक सुधारणा करायची असेल तर शेतीत आधुनिक यंत्राचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला पाहिजे, असे प्रतिपादन जागतिक बँकेचे पश्चिम बंगाल मधील सेवानिवृत्त अधिकारी डॉ.अरविंद डागा यांनी केले. गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगला जागतिक बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी डॉ.अरविंद डागा यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. प्रारंभी सोबसचे गिरीश संपत यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी सोबस इन्साईटस् फोरम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिग्विजय चौधरी, स्वेरीचे युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डॉ. हर्षवर्धन रोंगे व इतर संशोधक प्राध्यापक वर्ग आदी उपस्थित होते.

## उपरी येथे दिवसा धाडसी चोरी ; उघड्या घरातून ८ लाखांचे दागिने गायब

**सोलापूर** : उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने लॉकर मधील ८ लाख ७७ हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी रविवारी दुपारच्या सुमारास उपरी (ता.पंढरपूर) येथे घडली. यासंदर्भात बाळासाहेब तुकाराम नागणे (रा.उपरी) यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात फिर्याद दाखल केली. रविवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास त्यांच्या घरातील काही लोक झोपी गेले होते. घराच्या उघड्या दरवाजातून चोरट्याने आत प्रवेश केला . आणि पेटीतील १४५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि इतर चांदीचे साहित्य असा एकूण ८ लाख ७७ हजाराचा माल घेऊन पसार झाला. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक फौजदार जगताप करीत आहेत.

## झाडाची फांदी डोक्यात पडल्याने इसम जखमी

**सोलापूर** : जोडबसवण्णा चौकातील कालिकादेवी मंदिराजवळ दुचाकी वरून जात असताना झाडाची फांदी तुटून डोक्यात पडल्याने प्रदीप अण्णाराव लामतुरे (वय ६९, रा.मोदी) हे जखमी झाले . ही घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. ते दुचाकीवरून जात होते. त्यावेळी हा प्रकार घडला. अशी नोंद जेल रोड पोलिसात झाली आहे.

## पायी जाणाऱ्या तरूणाचा अपघाती मृत्यू

**सांगोला** : सांगोला ते जत या राज्य मार्गावरील लोणविरे फाटे जवळ रात्रीच्या वेळी पायी चालत जाणारा विकास प्रेम सागर निषाद वय २५ यास अज्ञात वाहनाने धडक देऊन मृत्यूस कारणीभूत ठरल्याची घटना मंगळवारी नऊ मे रोजी रात्री घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की सौरभ जगदीश निषाद वय १९ हा मूळचा उत्तर प्रदेशातील उनाव जिल्ह्यातील बांगरमा तालुक्यातील जत्रा गावचा असून तो तालुक्यातील सोनंद येथे आण्णासो खांडेकर यांच्या सिमेंटचे गमला कॉल फॅक्टरी मध्ये काम करी आहे याच फॅक्टरीमध्ये विकास निषाद हा ही काम करीत होता परंतु त्याला दारूचे व्यसन होते.

मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास दोघे भाऊ जेवण केले व झोपी गेले त्यावेळी तो दारू पिलेला होता सात वाजता उठून पाहिले असता विकास दिसला नाही म्हणून इकडे तिकडे चौकशी केली मालकाला कल्पना दिली त्यांना घेऊन इकडे तिकडे चौकशी केली असता लोणेरे फाटे जवळ रस्त्यावर एक व्यक्ती अपघात होऊन मयत झालेले समजले व त्याच ग्रामीण रुग्णालय सांगोला येथे घेऊन गेले आहेत हे समजल्यावर ग्रामीण रुग्णालयात जाऊन पाहिले असता तो विकास असल्याची खात्री झाली त्यानंतर अज्ञात चालकाविरुद्ध सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली.

# खासगी चाळ मालकांनी त्यांच्या चाळीचा मिळकत कर त्वरित भरावा : आयुक्त

### हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत प्रशासनाकडे आपले म्हणणे सादर करावे

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील खासगी चाळ मालकांनी त्यांच्या मालकीच्या चाळीचा मिळकत कर त्वरित भरून प्रशासनास सहकार्य करावे. आपली कोणती हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात प्रशासनाकडे आपले म्हणणे सादर करावे अन्यथा पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांनी केले आहे.

शहरातील मिळकतीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी पथके तयार करण्यात आलेली आहेत. शहरामध्ये बऱ्याच मिळकतींची कर आकारणी झालेली नाही. याबाबत सर्व्हे करून नविन मिळकती, नळ जोडणी इत्यादीबाबतची सविस्तर माहिती संकलीत करण्यासाठी पेठनिहाय पथके नियुक्त करण्यात आलेली आहे. याबाबत बुधवारी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी आढावा घेतला.

यामध्ये शहरामध्ये खाजगी चाळींच्या मालकाच्या महापालिका दफ्तरी नोंद आहे. तथापी ते या चाळींचा, जागेचा मनपा कर भरत नसल्याचे दिसून येते. या चाळीच्या जागेवर व खुल्या जागेवर नवीन इमारती,अपार्टमेंट बांधकाम झालेले आहेत. तथापि सदर चाळींचा / खुल्या जागेचा महापालिका कर भरत नसल्याचे दिसून आल्याने कारवाई करण्याचे आदेश आयुक्त तेली - उगले यांनी दिले आहेत.



सोलापूर शहर हद्दीतील चाळ स्वरुपाच्या इमारतीचा मिळकत कर वसूल होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदीनुसार चाळीतील जागेचा वापर करणाऱ्या व्यक्तीस भोगवटादार म्हणून मनपा मिळकत कर दफ्तरी नोंद घेऊन वापरात असलेल्या जागेचा मिळकत कर प्रत्येकाच्या नांवे हिश्शेराशीने होणाऱ्या थकबाकीसह भरण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. चाळीमध्ये राहणारे भाडेकरी यांनी तेथे चाळीच्या मुळ बांधकामामध्ये बदल करुन नव्याने बांधकाम व स्वतंत्ररित्या खाजगी नळ घेतलेला असून त्याच्या पाणीपट्टीसह मिळकत कर वसुली करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे.



सोलापूर शहरामध्ये बऱ्याच खाजगी जागांवर चाळ स्वरुपाचे बांधकाम असून त्याचा वापर बऱ्याच वर्षापासून राहणारे भाडेकरी करीत आहेत. अशा चाळ स्वरुपाच्या इमारती हया एकाच मालकीच्या असून, या इमारतींच्या कब्जाबाबतचे वाद अथवा अन्य कारणामुळे न्यायिक कार्यवाही सुरु असल्याने अशा मिळकतींच्या कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात आहे. ही मिळकत कराची थकबाकींची रक्कम भरण्यास जागा मालक अथवा भाडेकरु हे असमर्थता दर्शवितात. त्यामुळे बऱ्याच वर्षापासून मिळकत कराची वसुली होऊ शकली नाही.

## संभाजी महाराज जयंतीनिमित्त शनिवारी पाळण्याचा कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सह्याद्री फाउंडेशन सोलापूर संचलित धर्मवीर शंभूराजे जन्मोत्सव समितीतर्फे शनिवार, १३ मे रोजी रात्री ११ वाजता पाळण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सोहळयासाठी शहरातील विविध भागातून येणाऱ्या महिलांसाठी महापालिकेकडून बसेसची मोफत व्यवस्था करण्यात आली असून रात्री ११.४५ वाजता पारंपरिक वेशभूषा परिधान करून आलेल्या सर्व महिलांच्यावतीने एका सुरात छत्रपती संभाजी महाराजांचा पाळणा सुरू करण्यात येणार आहे. तसेच त्यानंतर शंभूराजे यांच्यावरील अंगाई गीतही काही निवडक महिला सादर करणार असून रात्री १२ वाजता गुलाल व पुष्पवृष्टी करून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम राजकीय पक्षातील सर्वांनी एकत्र येऊन आयोजित केला आहे. कार्यक्रमात सर्व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही तोडकरी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सीमा शिंदे, भाग्यश्री काळे, अलका भंवर, नीता गवळी, मंजूषा डोईफोडे आदी उपस्थित होत्या.

## प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांनी केल्या अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठातांच्या नेमणुका

सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठतांच्या नेमणुका करून संबंधितांना नियुक्तीपत्रे दिली.

यानुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्समधील डॉ. लक्ष्मीकांत दामा यांची तर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पंढरपूर येथील डॉ. प्रशांत पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता म्हणून डी. ए. व्ही. कॉलेज ऑफ कॉमर्स येथील डॉ. शिवाजी शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.

मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी संगमेश्वर महाविद्यालयातील डॉ. वसंत कोरे यांची तर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून सोलापूर सोशल कॉलेजमधील डॉ. आय. जे. तांबोळी यांची नियुक्ती झाली आहे.

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठतापदी वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ यांची तर दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील डॉ. विठ्ठल किडगावकर यांची प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून निवड झाली आहे.

बुधवारी सकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी सर्व प्रभारी अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांची बैठक घेऊन शुभेच्छा दिल्या व प्राधान्याने परीक्षेच्या निकालाचे काम मार्गी लावण्यासंदर्भात सूचना दिल्या. यावेळी कुलसचिव योगिनी घारे व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर उपस्थित होते.




## शासन योजनेतील लाभार्थ्यांना ट्रॅक्टर, ब्लोअरचे वाटप

सुराज्य/बार्शी

महाडिबीटी पोर्टलवर यांत्रिकीकरण अंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते ३ लाभार्थ्यांना ट्रॅक्टर व २ लाभार्थ्यांना द्राक्ष फवारणी यंत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी शहाजी कदम यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समिती येथील तालुका कृषी कार्यालय जवळ हा कार्यक्रम झाला.

देवगांव येथील मारूती मारकड , साकत येथील अर्जुन धुमाळ, उज्वला हाजगुडे हे ट्रॅक्टरचे निवड झालेले लाभार्थी आहेत. तर जामगांव येथील राहुल सातपुते, उपळाई ठों येथील श्रीधर ठोंगे हे ब्लोअरचे लाभार्थी आहेत.

## विद्या साबळे यांच्या पाऊलवाटाचे आज प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

येथील कवयित्री विद्या साबळे यांच्या पाऊलवाटा' या काव्यसंग्रहाचे गुरुवार, ११ मे रोजी सायंकाळी सहा वाजता शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृहात प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती संयोजिका संध्या बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा प्रकाशन सोहळा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते व ज्येष्ठ लेखक दत्ता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

याप्रसंगी माजी नगरसेवक प्रवीण निकाळजे, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, पंढरपूरच्या लेखिका आशा पाटील, वसुंधरा कला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मीना गायकवाड, लिंबीचिंचोळीच्या जगद्‌गुरू रेवणसिद्धेश्वर प्रशालेचे मुख्याध्यापक म्हांताप्पा आतनुरे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.




कवयित्री साबळे या दक्षिण सोलापूर तालुक्यातील लिंबीचिंचोळी येथील रेवणसिध्देश्वर प्रशालेत सहशिक्षिका असून ८० कविता असलेला हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, समाजसुधारकांच्या जीवनावर तसेच कौटुंबिक आदी विषयांवर त्यांनी कविता केल्या असून या प्रकाशन सोहळयास काव्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही बनसोडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस कवयित्री विद्या साबळे, सूरज साबळे, श्रीमंत बनसोडे आदी उपस्थित होते.

## महिलेस मारहाण करून दागिने लुटले ; दरोड्याच्या आरोपातून चौघांची मुक्तता

सुराज्य/सोलापूर

कमी किमतीत सोने देतो म्हणून एका महिलेस मोटारीतून नेताना मारहाण करीत त्यांच्या अंगावरील दागिने आणि रोख रक्कम असा ३ लाख ७६ हजाराचा ऐवज लुटल्याच्या आरोपातून रमेश बाबुराव आमरे, प्रकाश श्रीपती पालकर (दोघे रा. पुणे), अनिल जाफर काळे (रा. यल्लमवाडी ता.मोहोळ) आणि बप्पा चक्रधर काळे (रा.देगाव वाळूज) या चौघांना गुन्हा शाबीत न झाल्यामुळे निर्दोष मुक्त करण्याचा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही.एच. पाटवदकर यांनी नुकताच दिला आहे.

पुणे येथील मीरा व्यंकटेश प्रभू यांना कमी किमतीत सोने देतो म्हणून वरील आरोपीसह इतरांनी ७ मे २०14 रोजी ओमिनी मोटारीत बसून सोलापूरच्या दिशेने निघाले होते. दुपारी दोन वाजेच्या सुमारास नरखेड ते बार्शी रोडवर आरोपींनी त्यांना मारहाण करून त्यांच्या अंगावरील सोने आणि ६० हजार रुपये रोख असा ऐवज लुटला होता. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी चौघासह इतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गुन्हा सिध्द न झाल्यामुळे न्यायालयाने चौघांची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. सुरेश पाटील-कुरुलकर, ॲड. आर.बी. बायस तर सरकार तर्फे ॲड. दत्ता पवार यांनी काम पाहिले.



## जिल्हाभरात हातभट्टी दारूविरोधी मोहिमेत ४ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुधवारी जिल्हाभरात हातभट्टी दारूविरोधात राबविलेल्या विशेष मोहिमेत ११ गुन्ह्यांत १३ हजार ७०० लिटर गूळ मिश्रित रसायन व १७०० लिटर हातभट्टी दारूसह ४ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी सकाळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथील निकिता अर्जुन चव्हाण (वय ३०) या महिलेच्या राहत्या घरातून तीन रबरी ट्यूबमध्ये साठवून ठेवलेली ३०० लिटर व रतनबाई सोमनाथ राठोड (वय ४२) या महिलेच्या ताब्यातून दोन रबरी ट्यूबमधील २०० लिटर हातभट्टी दारू जप्त केली.

तसेच संजय किसन राठोड (वय ४२) व राजू संजय राठोड, (वय २२) यांच्या घरात हातभट्टी दारूचा साठा जप्त करण्यात आला. सीमा तपासणी नाका व भरारी पथकाने मुळेगाव तांडा परिसरातील हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकून ८८५० लिटर रसायन जागीच नाश केले. तसेच बक्षीहिप्परगा ता. दक्षिण सोलापूर परिसरात सीताराम तांड्याच्या पूर्वेस काटेरी झुडपात चालू असलेल्या हातभट्टी अड्ड्यावर धाड टाकून १७०० लिटर रसायन जागीच नाश केले. शिवाय निरीक्षक पंढरपूर विभागाच्या पथकाने करमाळा तालुक्यातील वांगी क्रमांक १ ढोकरी रोडच्या बाजूस शेतामध्ये सुरू असलेल्या हातभट्टीवर धाड टाकून गणेश सहदेव जाधव या इसमास अटक केली.

ही कारवाई अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नितीन धार्मिक यांच्या नेतृत्वात प्रभारी उपअधीक्षक सदानंद मस्करे, निरिक्षक सूरज कुसळे, पवन मुळे, सुनील कदम, दुय्यम निरिक्षक रोहिणी गुरव, अक्षय भरते, सचिन गुठे, मयूरा खेत्री, सहायक दुय्यम निरिक्षक मुकेश चव्हाण, जवान चेतन व्हनगुंटी, प्रशांत इंगोले, इस्माईल गोडीकट, प्रकाश सावंत, योगीराज तोग्गी, शोएब बेगमपुरे, अनिल पांढरे, भाग्यश्री शेरखाने, विकास वडमिले, संजय नवले व रशीद शेख यांच्या पथकाने पार पाडली.

# दि सोलापूर सोशल अर्बन बँकेस १.७ कोटींचा निव्वळ नफा

### लाभांशची रक्कम बँकेतून घेऊन जावी: चेअरमन ॲड. बेरिया

सुराज्य/सोलापूर

दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप बँकेने २०२२-२३ या संपलेल्या आर्थिक वर्षात केवळ एक शाखा असताना हि बँकेने लेखा परिक्षणपूर्व १४७.९३ लाखाचा ढोबळ नफा तर तब्बल १ कोटी ७ लाखाचा निव्वळ नफा मिळकविल्याची माहिती बँकेचे चेअरमन ॲड्यु.एन.बेरिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. अश्या प्रकारे अनेक अडचणींना तोंड देत बँकेने आर्थिक विकास केला असल्याची माहिती दिली.

दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप बँकेकडे ४४७३ लाख रुपयांच्या ठेवी असुन २३९४ लाख रुपयांची कर्जे वितरीत केली आहेत. बँकेचा एकुण व्यवसाय ७६१५ लाख रुपयांचा झाल आहे. बँकेचे भागभांडवल २८५.०८ लाख रुपये आहे तर बँकेची निव्वळ संपत्ती ७०९.८८ लाख रुपये आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (सीआरएआर) १२ टक्के असणे अपेक्षित आहे. मात्र, दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप बँकेने यात देखील आघाडी घेतली असुन बँकेची भांडवल पर्याप्तता ३१.०४ टक्के आहे. त्यामुळे बँकेच्या भांडवलाची स्थिती उत्तम असल्याचेही डबेरिया यांनी सांगितले.

यंदा बँकेने १४७.९३ लाख रुपयांचा ऑपरेटिंग नफा मिळवला आहे. बँकेच्या नेट एन.पी.ए. मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठी घट होऊन नेट एन.पी.ए. ०७ टक्क्यापर्यंत खाली आला आहे. सोलापूर सोशल अर्बन बँकेच्या कर्जाचे व्याजदर इतर बँकांच्या कर्जाचे व्याजदर इतर बँकांच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा फायदा होत आहे. कॅश क्रेडिट कर्ज १२ टक्के तर पगारदारांना १३ पर्यंत दराने कर्ज देण्यात आल्याने ग्राहकांना बँकेकडुन अनोखी भेट मिळत आहे. बँकेच्या कामकाजात व झालेल्या विकासात बँकेचे व्हा.चेअरमन नसीरअहमद खलिफा, संचालक मैनोद्दीन शेख, अ.रजाक नाडेवाले, तौफिक हत्तुरे, तौफिक शेख, म.शफी शेख, मुबीन बागवान, बापु मेंगेरी, शंकर गोडलोलू, ॲड सरफराज पिरजादे, ॲडरियाज मनगोळी, संचालिका कनिजफातिमा कांचवाला व नाझीया मुलाणी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

**सभासदांनी लाभांशची रक्कम बँकेतून घ्यावी**

दि सोलापूर सोशल अर्बन को–ऑप बँकेच्या सभासदांना आर्थिक वर्षासाठी १२७ लाभांश देणेस संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे.त्यास मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी हि मान्यता दिली आहे. बँकेने एकुण रक्कम रुपये ३२ लाख चार हजारची तरतुद लाभांश साठी केलेली आहे. ज्या सभासदांची खाती आहेत त्याच्या रक्कमा खात्यात जमा घेण्यात येतील. परंतु बरेच सभासदांचे खाते निष्क्रीय असुन काही सभासदांचे बँकेत खाते नाही. अश्या सर्व सभासदांनी त्यांच्या लाभांशची रक्कम दररोज दुपारी ३ ते ५.३० या वेळेत बँकेतुन घ्यावी असे अहवान बँकेचे चेअरमन यु.एन.बेरिया यांनी केले आहे.

## अभिनेता संतोष जुवेकर बनला जालिंदर

**सोलापूर** : अभिनेता संतोष जुवेकरच्या रावडी किंवा सोज्वळ नायकाच्या भूमिकांना प्रेक्षकांनी नेहमीच पसंती दर्शवली आहे.आता प्रथमच एका ऐतिहासिक चित्रपटात वेगळ्या नकारात्मक भूमिकेत तो दिसणार आहे. कपटी स्वभावाचा जनावरांचा दलाल असलेला जालिंदर हा शत्रूंशी संधान बांधून कसे डावपेच रचतो? हे यात पहायला मिळणार आहे. निर्माते शशिकांत शीला भाऊसाहेब पवार आणि दिग्दर्शक अनुप जगदाळे रावरंभाफ ही प्रेमकहाणी प्रेक्षकांसमोर आणली असून येत्या १२ मे ला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

धारिका क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात दिनांक: १० मे, २०२३

आयोगामार्फत शासनाच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील पद भरतीसाठी विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | विभाग | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०२२/२०२३ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | संचालक, आयुष, गट-अ आयुष संचालनालय | ०१ |
| ०२३/२०२३ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सहायक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ, समाज कल्याण आयुक्तालय | ४१ |
| ०२४/२०२३ | | समाज कल्याण अधिकारी, गट-ब, समाज कल्याण आयुक्तालय | २२ |
| ०२५/२०२३ | | गृहप्रमुख, गट-ब, समाज कल्याण आयुक्तालय | १८ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत संबंधित परीक्षा योजना व अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in व https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १५ मे, २०२३ ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.
ठिकाण : मुंबई सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

# जादूटोणा विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करा : ठोंबरे

सुराज्य/सोलापूर

**जादूटोणा, अघोरी प्रथा या समाजासाठी घातक असून राज्यात असले प्रकार वाढता कामा नये यासाठी अस्तित्वात असलेल्या जादूटोणाविरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.तसेच जादुटोणा विरोधी कायदाबाबत जनसामान्यांना विविध माध्यमातून माहिती देण्यासाठी अधिक जनजागृतीबाबत मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात यावे, अशा सूचना प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिल्या.**



जादूटोणाविरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी समाज कल्याणचे सहा. आयुक्त नागनाथ चौगुले, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलीस निरिक्षक सुहास जगताप, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्यात जादूटोणा, अनिष्ट व अघोरी प्रथा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. तसेच या कायद्याची जनजागृती मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे असून, जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रचार व प्रसारा सोबतच कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अनिष्ट प्रथा परंपरा व जादूटोणा समाजाच्या प्रगतीत मोठा अडथळा निर्माण करतात. यासाठी समाजाने सुद्धा प्रत्येक घटनेकडे जागृक नागरिक म्हणून पहावे असेही प्र. जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी सांगितले.

तसेच जादुटोणा विरोधी कायद्याचा प्रसार करण्यासाठी नेमलेल्या समितीत विभागीय समन्वयक म्हणून अशासकीय सदस्यांची नियुक्तीचे प्रस्ताव लवकरात लकवर पाठविण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जादूटोणा विरोधी कायदा बैठकीनंतर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली या सभेत अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यात ट्रॅासिटीचे घडलेले गुन्हे याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यातबाबत सूचना करण्यात आल्या.

# परीक्षेच्या निकालाचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार!

## नूतन प्रभारी कुलगुरू डॉ. कामत वॉर मधून घेताहेत आढावा

सुराज्य/सोलापूर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या निकालाचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार असल्याची ग्वाही नूतन प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी दिली.

डॉ. कामत यांनी गेल्या शुक्रवारी पदभार घेतल्यानंतर सोमवारपासून प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली आहे. सुरुवातीलाच त्यांनी परीक्षा विभागाचा आढावा घेताना अनेक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर न झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबद्दल त्यांनी परीक्षा विभागाची व निकालाची संपूर्ण माहिती घेऊन स्वतः दररोज सायंकाळी 'वॉर'रूम मध्ये बसून निकाल लावण्यासंदर्भात नियोजन करून अधिकारी, कर्मचारी, शिक्षकांना निर्देश दिले आहेत. तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन त्या संदर्भात त्यांनी उपाय सुचविले आहेत. त्यानुसार परीक्षा विभागाची टीम कामाला लागली आहे. सोबतच विविध विद्याशाखांच्या अधिष्ठातांची देखील नियुक्ती झाल्याने त्यांनाही सोबत घेऊन परीक्षा विभागाला मदत करण्याचे निर्देश प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांच्याकडून देण्यात आले आहेत.

६० टक्के अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल लागले आहेत, तर ४० टक्के परीक्षांचे निकाल जाहीर होणार आहेत. 'ऑनस्क्रीन' तपासणीच्या पद्धतीमुळे तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. या तांत्रिक अडचणींवर नूतन प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांनी उपाय सुचवून यंत्रणा कामाला लावल्याने लवकरच सर्व परीक्षांचे शंभर टक्के निकाल जाहीर होतील. त्याबरोबरच पुढील परीक्षांचे नियोजन देखील करून लवकर सेमिस्टर संपवण्याचे निर्देश देखील त्यांनी परीक्षा विभागाला दिले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पुढील शैक्षणिक वर्ष लवकर सुरु करण्यात येईल, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.



## विवेकानंद केंद्राच्या वासंतिक शिबिराला सुरुवात

### १०५ शिबिरार्थींचा सहभाग

सहावी ते नववी इयत्तेतील मुलामुलींसाठी हे शिबिर होत आहे. १४ मे पर्यंत हे शिबिर चालणार आहे. यात गणप्रमुख व सहगणप्रमुखांसह १०५ शिबिरार्थींचा सहभाग आहे.

सोलापूर : विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर व जुळे सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित वासंतिक शिबिरास बुधवारी (दि. १०) सकाळी जुळे सोलापुरातील विवेकानंद केंद्र वेदांतिक ॲप्लिकेशन ऑफ योग अँड मॅनेजमेंट (वि. के. वयम्) येथे सुरुवात झाली. आडत व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांच्या हस्ते या शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन झाले.

आडत व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष चिक्कळी म्हणाले, मुलांनी लहानपणापासूनच चांगले विचार आत्मसात करण्याची आणि त्यानुसार अनुसरण करण्याची गरज आहे. तसेच त्यांनी चांगल्या विचारांच्या सान्निध्यात राहायला हवे. तरच देशाभिमानी नागरिक घडू शकेल. विवेकानंद केंद्राच्या जुळे सोलापूर शाखेचे नगर संचालक नंदकुमार चितापुरे म्हणाले, लहान मुलांच्या मानसिक, शारीरिक व बौध्दिक विकास होईल या दृष्टीने शिबिराची रचना आहे. विविध बौध्दिक सत्र, कलाकौशल्ये, क्रीडायोग आदी विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुले संस्कारक्षम बनतील आणि त्यांचा विविधांगी विकास होईल.स्वागत व प्रास्ताविक जुळे सोलापूरचे नगरप्रमुख शरणू डोंगराजे यांनी केले. सुप्रिया येळमेली यांनी गीत गायिले. याप्रसंगी सोलापूर नगर सहसंचालक पेंटप्पा गड्डम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# वेळापुरात माने-देशमुख यांचा सन्मान

सुराज्य/वेळापूर



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदी बाळासाहेब माने देशमुख व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून शेतकऱ्याच्या मुलाने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल अनिकेत माने -देशमुख या दोघांचा सन्मान स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने- देशमुख यांच्या निवासस्थानी वेळापुर येथे मारुतीराव माने देशमुख, दौलतराव माने देशमुख, नामदेव माने देशमुख या ज्येष्ठांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे नूतन संचालक बाळासाहेब देशमुख म्हणाले आपण सर्वजण खंबीरपणे माझ्या पाठीशी असल्यामुळे मी संचालक झालो. माझे संचालक पद सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी असेल.

तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रात प्रथम आलेल्या अनिकेत माने देशमुख घरातील सन्मानाने भारावून जाऊन घरातील जेष्ठ यांची कौतुकाची थाप मला नेहमीच भविष्यात प्रेरणादायी राहील असे सांगीतले.

या सत्कार समारंभ प्रसंगी महादेव देवालय ट्रस्ट वेळापूरचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, कल्याणराव माने देशमुख, धनंजय माने देशमुख, श्रीकृष्ण माने देशमुख, सिध्देश्वर माने देशमुख, विराज माने देशमुख, तानाजी माने देशमुख, एकनाथ माने देशमुख, सुधीर मान देशमुख, धैर्यशील माने देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे वेळापूर शहराध्यक्ष दादा पवार, भारत माने देशमुख, तानाजी माने देशमुख, आकाश मान देशमुख, पप्पू निंबाळकर, सचिन माने देशमुख, दीपक माने देशमुख, बंडू काका माने देशमुख, हर्षद माने देशमुख, जयदीप माने देशमुख, राजदीप माने देशमुख, यशराज माने देशमुख, मेघराज माने देशमुख, परिवारांच्या वतीने सन्मान करण्यात आला.



# रासपच्यावतीने मुख्याधिकाऱ्यांच्या पुतळ्यास माशांचा हार

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी शहरातील टेंभुर्णी रोडवरील गोल काडादी व उभी काडादी चाळ, उगाडे वस्ती आदी ठिकाणच्या नागरिकांच्या नगरपरिषदेने पाणीपुरवठा करत असलेल्या नळातून मासे येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

याचा निषेधार्थ राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने मुख्याधिकारी यांचा प्रतीकात्मक पुतळा तयार करून त्याला मासे, घरकुल मसाला, कोथिंबीर, अद्रक, तेल याचा हार घालून निषेध करण्यात आला.

यावेळी आंदोलकांचे निवेदन पाणीपुरवठा विभागाच्या अभियंता कोमल वावरे यांनी स्वीकारले.

यावेळी अभिजीत सोलंकर म्हणाले नगरपरिषदेने घरपोच मासे अशी नवीन योजना राबवली आहे, यामुळे नागरिकांना बाहेर कोठे मासे घेण्याची गरज नाही, आणि म्हणूनच मुख्याधिकारी व पाणीपुरवठ्याचे अधिकारी यांचा कुर्डूवाडीतील नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात यावा म्हणून हे आंदोलन घेण्यात आले.

जिल्हा संपर्क दिलीप गडदे म्हणाले नगरपरिषदेचे अधिकारी नागरिकांच्या आयुष्याचा खेळ खेळत आहेत. एखाद्या नागरिकाला हे दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे आजार झाला तर यास जबाबदार कोण व यापुढे असे मासेयुक्त पाणी नळाला आल्यास मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी केली.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप गडदे, धनाजी कोकरे, अभिजीत सोलंकर, उदय होदाडे, संकेत होनमाने, बाहुबली देशमाने, भाऊ गायकवाड, समाधान शिंदे, वैभव शिंदे, भैय्या गोफणे, अमोल पवार, किरण अस्वरे, बापू लेंगरे, नितीन चव्हाण, रोहित देवकुळे, अविनाश लेंगरे, कैलास खिलारे, सुरज अस्वरे, वसीम नदाफ, कानिफ कांबळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

## बलकर ट्रक व ट्रेलर यांच्या अपघातात एक ठार,चार जखमी

सुराज्य/मोहोळ

सोलापूर पुणे महामार्गावर चिखली ( ता मोहोळ ) पाटीजवळ बलकर ट्रक व ट्रेलर यांची धडक होवून एक जण ठार तर चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी रात्री उशिरा घडली

याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार हिवरे गावाहुन चिखली गावाकडे बलकर ट्रक एम एच १२ एस एक्स ८३२७ हा निघाला होता तर ट्रेलर क्र आर जे ३२ जी डी ०३९८ सोलापूर हुन पुण्याकडे निघाला होता तो भरधाव वेगात होता त्याने चिखली गावाकडे वळत असलेल्या बलकर ट्रकला जोरात धडक दिली यात केबीन मध्ये बसलेला महादेव दिगंबर गायकवाड वय २२ ( रा चिखली ) हा उडून ट्रेलरच्या चाकाखाली पडला गंभीर जखमी होवून मयत झाला तर बापू सुर्यभान मस्के वय ३२ मरिबा उर्फ पप्पू भागवत मते वय ३२ रा दोघेही (रा. चिखली) हे गंभीर जखमी झाले तर ट्रेलर चा चालक व त्यातील एक इसम (नावे माहीत नाहीत) हे ही गभीर जखमी झाले असे चार जखमींना पुढील उपचारासाठी सोलापूर येथे पाठवण्यात आले आहे.

या बाबत भरधाव वेगाने येणारा व हयगयीन वाहन चालवून धडक देणाऱ्या ट्रेलर चालकांच्या विरोधात माहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास मोहोळ पोलिस कारित आहेत

## पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघातर्फे मोफत तेलूगू वर्ग

सुराज्य/सोलापूर

पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाचे वतीने शुक्रवार दिनांक १२ पासून शुक्रवार दिनांक १९पर्यंत आठ दिवस सकाळी ९:३० ते १०:३० वाजेपर्यंत कुचन प्रशाला २७२, रविवार पेठ, सोलापूर येथे मोफत तेलुगू वर्गाचे उदघाटन बँक ऑफ इंडिया ओ.बी. सी. एम्प्लॉईज चे राष्ट्रीय अध्यक्ष मा.सुरेश श्रीराम यांचे अध्यक्ष तेखाली व पद्मशाली शिक्षण संस्थेचे सहसचिवा संगीताताई इंदापुरे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यांत येत आहे.

सदरचे वर्गास कुचन प्रशालेचे तेलुगू विभागातील सेवानिवृत्त शिक्षक केशव पुंजाल सर मार्गदर्शन करणार आहेत. तरी ज्यांना तेलुगू भाषा लिहिण्या वाचण्यास शिकावयाचे आहे त्यांनी सचिव यशवंत इंदापुरे यांचे मोबाईल नंबर ८४२१६०७१२५ वर संपर्क करून नांवे नोंदवावीत आणि जास्तीत जास्त जणांनी नांवे नोंदवून तेलुगू शिकण्याचा लाभ घ्यावे. असे आवाहन अध्यक्ष श्रीहरी कुरापाटी व उपाध्यक्ष अनिल कन्ना खजिनदार नागनाथ गज्जम आणि समिती प्रमुख सत्यनारायण बरदेपूर यांनी आवाहन केले आहे.

# शिक्षकांनी हरहुन्नरी बनावे : वाघमारे

## निकंबे यांच्या दोन काव्यसंग्रहाचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर



विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आजच्या शिक्षकांनी हरहुन्नरी असले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक योगिराज वाघमारे यांनी केले.

बुधवारी शिवशाही समोरील वसंत लता कार्यालयात कवी -सुरेश निकंबे लिखित हर घर तिरंगा व संस्कार फुले या दोन काव्यसंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक कवी सुरेश निकंबे यांनी करून आपल्या गेय स्वरूपाच्या कविता सादर करून दाद मिळवली. यावेळी कवी देवेंद्र औटी यांनी निकंबे यांनी लिहिलेल्या कवितांचा आढावा घेतला. रोहित बिराजदार, कुभारीचे सरपंच श्रुती निकंबे, जागृती पब्लिकेशनचे प्रकाशक विजय गायकवाड, रमेश गायकवाड, राम निकंबे, दत्तात्रय निकंबे, रघुनाथ निकंबे, विलास निकंबे, महेश निकंबे, धर्मा निकंबे, भिमराव चंदनशिवे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्नेहल निकंबे यांनी केले.तर आभार रमेश गायकवाड यांनी केले.

## ⏩ निधन वृत्त



### बजीरंग जाधव

उ. सोलापूर : वानेवाडी येथील बजीरंग कृष्णात जाधव( वय ६५) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, आणि पत्नी असा परिवार आहे.ते पत्रकार तुकाराम जाधव ह्यांचे चुलते होत.




### अन्नपूर्णा स्वामी

उ. सोलापूर : मार्डी येथील अन्नपूर्णा श्रीकंठ स्वामी (वय ५९ )वर्ष यांचे निधन झाले.. त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना,नातवंडे, नणंद असा परिवार आहे.



### कासम मोमीन

अकलूज : अकलूज येथील मुस्लीम समाजाचे जेष्ठ नागरिक कासम मसरूद्दीन मोमीन यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८३ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले, तीन मुली,नातवंडे असा परिवार आहे.अकलूजच्या कलासागर लॅबचे प्रिंटर सलीम कासम मोमीन यांचे ते वडील होते.




### ग्यानोबा मान

सोलापूर : नवीन आरटीओ कार्यालयाजवळील साईश नगरातील माजी सैनिक व भारतीय रिझर्व्ह बँकेतील निवृत्त सेक्युरिटी सुपरवायझर ग्यानोबा श्रीमंत माने (वय ६२)यांचे हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली , नातवंडे असा परिवार आहे.



### वत्सलाबाई वळसंगे

सोलापूर : तीर्थ ता. द. सोलापूर येथील माजी सरपंच कै. जगन्नाथ मेंथे यांची बहीण वत्सलाबाई चनबसप्पा वळसंगे यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. माजी सरपंच कल्याणराव मेंथे यांचे आत्या होत.



### विठाबाई कोळी

सोलापूर : माळकवठे येथील विठाबाई भागण्णा कोळी (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे.नाट्य कलाकार चिदानंद कोळी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तिन मुलं,दोन मुली,सुना ,नातवंड असा परिवार आहे.

# शंकरनगर ग्रामपंचायत आणि शिवरत्न वेलफेअर ट्रस्टचा नवा आदर्श

## शाळा-महाविद्यालयात बसविल्या सॅनेटरी नॅपकीन मशिन

सुराज्य/अकलूज



शंकरनगर ग्रामपंचायत आणि शिवरत्न वेलफेअर ट्रस्ट यांच्या विद्यमाने परीसरातील शाळा महाविद्यालयात सॅनीटरी नॅपकीन व्हेंडींग व डिस्पोजींग मशिन बसवुन मुलींच्या आडचणी सोडविल्या आहेत. तसेच गावातील गरजु व इच्छुक महिलांना उद्योगाचे प्रशिक्षण देवुन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पाऊल पुढे टाकले आहे.

शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेणार्या मुलींची गैरसोय होवुन त्यांच्या शिक्षणावर परीणाम होवु नये.या ऊदात्त हेतुने शंकरनगर ग्रामपंचायत आणि शिवरत्न वेलफेअर ट्रस्टने स्वनिधीतुन शंकरनगर परीसरातील महर्षि प्रशाला, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, अभियांत्रिकी महाविद्यालय,शिवरत्न नालेज सिटी व प्राथमिक आरोग्य केंद्र या पाच ठिकाणी प्रत्येकी एक प्रमाणे पाच सनीटरी नपकीन व्हेंडींग व डिस्पोजींग मशिन बसुन राज्यासमोर आदर्श निर्माण केला आहे.

शिवरत्न ट्रस्टच्या अध्यक्षा तथा माळशिरस पंचायत समितीच्या माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते-पाटील व शंकरनगरच्या माजी सरपंच देवश्रीदेवी मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतुन साकारलेल्या या ऊपक्रमातुन अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वैष्णवीदेवी मोहिते-पाटील यांचे हस्ते मशिन बसविण्यात आले. मशिनमुळे केवळ पाच रुपयामध्ये मुलींना सनीटरी नपकीन उपलब्ध होवुन मुली व महिलांची गैरसोय दुर झाली आहे.

तसेच गावातील १३० महिलांना शंकरनगर ग्रामपंचायत आणि शिवरत्न वेलफेअर ट्रस्ट यांच्या सहकार्याने ५ते ११मे या कालावधीत पुणे येथील कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग विद्यालययांचे मार्फत व्यवसाय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. कांचनमालादेवी मोहिते-पाटील व माजी सरपंच देवश्री सत्यशिलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते ऊद्घाटन करण्यात आलेल्या या शिबीरामध्ये महिला अर्थिक विकास महामंडळाकडुन निवड झालेल्या इच्छुक १३० महिलांची निवड करण्यात आली.यामध्ये मसाले बनविने ४० महिला,नैसर्गिक आईस्क्रीम बनविणे (३०),कागदी पिशवी बनविने (३०),कापडी पिशवी बनविणे( ३०) अशा प्रकारे महिलांचा समावेश करण्यात आला आहे.१लाख ९४ हजार रुपयांचा खर्च करुन सदर प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रीया ऊद्योग योजना जिल्हा व्यवस्थापक समाधान खुपसे यांनी व्यवसायासाठी कर्ज आणि शासकीय अनुदानाविषयी मार्गदर्शन केले.

शिवरत्न वेलफेअर ट्रस्टच्या अध्यक्षा वैष्णवीदेवी मोहिते-पाटील यांनी महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करुन गावातील जास्तीत जास्त अथक प्रयत्नातुन महिलांना स्वयंपुर्ण बनविले आहे. वरील दोन्ही कार्यक्रमासाठी गीतांजली जगताप, शिवरत्न वेलफेअर ट्रस्टच्या अध्यक्षा वैष्णवीदेवी अर्जुनसिंह मोहिते पाटील, कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग विद्यालयाच्या प्राचार्या मृदुला जक्कल, माजी जिल्हा परिषद सदस्या सुनंदाताई फुले, यशवंतनगर सरपंच वर्षा सरतापे,माजी सरपंच लक्ष्मी डावरे उपस्थित होत्या.

# अक्कलकोट तालुक्यात वादळी पावसाचा कहर

✔ सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह अचानकपणे अवकाळी जोरदार पाऊस झाला. त्यामध्ये काही ठिकाणी घरावरील पत्रे उडून गेली तर काही ठिकाणी वीज पडून जनावरे दगावली आहेत. झाडे उन्मळून पडली आहेत. यामुळे शेतकरी वर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे.**





मंगळवारी सकाळपासूनच वातावरणात मोठ्या प्रमाणात गर्मी होती. दुपारी दीड वाजता आकाशात सर्वत्र काळे ढग दाटून आले. सुरूवातीला वादळ वारे सुटले. आकाशातील काळे ढग सर्वत्र घेरटा घालत वादळी वाऱ्याचा पाऊस सुरू झाला. केवळ अर्धा तासात अनेक ठिकाणी होत्याचे नव्हते करून टाकले.

मंगळवारी लग्नाचे मुर्हत अधिक होते. यामुळे अनेक गावातील वऱ्हाड परगावी अडकून बसले. रस्त्यावर झाड उन्मळून पडल्याने मार्गात बदल करून रात्री उशिरा गाव गाठावे लागले.तळेवाड, सातनदुधनी, बोरगाव दे. वागदरी अशा काही ठिकाणी जुने झाड उन्मळून पडून रस्ता काही काळ बंद झाला होता. कोन्हाळी, कर्जाळ, हालहळ्ळी अ, चपळगाववाडी, बोरोटी बु. वागदरी, किरनळळी, दोड्याळ, जेऊर, भोसगे, हंजगी बोरगाव दे, घोळसगाव, रामपूर, आदी परिसरात नुकसान केले आहे.

### नुकसान भरपाई मिळेना

नुकसान झाल्यानंतर शेतकरी, पशुपालक नुकसान भरपाई मिळविण्यासाठी संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी, तलाठी यांच्या कडे कागदपत्रांसाठी धाव घेतली असता, एकमेकांवर चाल ढकल करून मदत मिळवून देऊन नुकसानीत शेतकऱ्यांचे सांत्वन करण्या ऐवजी छळ केला जात असल्याची तक्रार पशुपालक रमेश बिराजदार यांनी केली आहे. वारंवार तहसील कार्यालयात हेलपाटे मारूनही नुकसान भरपाई मिळाली नाही.अशी तक्रार आहे.

**वीज पडून जनावरे ठार**

कर्जाळ येथील शेतकरी अंबण्णा कोळी, जेऊर येथील शेतकरी विश्वनाथ माधप्पा निंबाळ, भोसगे येथे मल्लिनाथ शिलवंत, रामपूर येथील शेतकरी रमेश बिराजदार, हालचिंचोळी येथील शेतकरी बसवराज कोळी यांच्या बैलाचा वीज पडून मृत्यू झाला. दोड्याळ येथे सिद्धप्पा शांतप्पा पुराणिक यांची गाय ठार झाली आहे. तालुक्यात वीज पडण्याचे प्रमाण मागील तीन वर्षात वाढले आहे.

**घरावरील पत्रे उडाली**

हंजगी येथे नूरद्दीन शेख, शंकर म्हमाणे यांनी लग्नाला गेले असता दोघांच्या घरावरील पत्रे उडून जाऊन धान्य ,कपडे, वगैरे भिजून नुकसान झाले आहे. किरनळ्ळीत शेतकरी चंद्रकांत हुलगले यांची पपई बाग आडवी होऊन लाखोंची नुकसान झाले आहे.

**यलम्मा देवी यात्रेत वाहने अडकली**

कोन्हाळी ता.अक्कलकोट येथे ग्रामदैवत श्री यलम्मा देवीची मंगळवारी वर्षीक यात्रा उत्सव होता.त्यासाठी परगावाहून हजारो भाविक व छोटे छोटे व्यवसायिक सामील झाले होते. सदर यात्रा मोकळ्या रानात भरवली जाते. अचानकपणे आलेल्या पावसाने चिखल, थांबलेल्या पाण्यात टेम्पो, कार, मोटारसायकल, असे सर्वकाही अडकून बसले होते. ट्रॅक्टर लावून वाहने बाहेर काढण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.



## म.बसवेश्वर जयंती पिलीव येथे साजरी

✔ **पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी झाली. सालाबादप्रमाणे विरशैव लिंगायात समाजा तर्फे पिलिव मध्ये महात्मा बसवेश्वर जयती मोठ्या थाटामाटात साजरी झाली. जयंती चे औचित्य साधून समाजाने सकाळी विरशैव लिंगायात समजाने राजस्तरीय वधू - वर परिचय मेळावा घेतला होता, ह्या मेळाव्यास मोठा प्रतिसाद मिळाला सुमारे १५० मुला मुलींनी मेळाव्यास भेट देऊन नावनोंदणी केली. तर सायकाळी माढेकर महाराज आणि शिंगणापूर कर महाराज यांचे प्रवचन ,सुहास उरवणे यांचे महात्मा बसवेश्वर यांच्या वरील व्याख्यान व अध्यक्षीय भाषण झाले ,या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आमदार. विजयकुमार देशमुख,तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर उपस्थित होते. यावेळी विरशैव लिंगायात समाजाचे अध्यक्ष शुभजीत नष्टे, उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख,सचिव गणेश देशमुख,महात्मा बसवेश्वर जयती उत्सव समितीचे अध्यक्ष संकेत देशमुख, अमोल नष्टे,विनायक आर्वे,सुहास कोल्हे,चंद्रकांत धसाडे, ,शिवम घोंगडे,प्रथमेश घोंगडे , आरव जेऊरकर,यश उरवणे यांनी परिश्रम घेऊन जयती पार पाडली. यावेळी समजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राजकीय, सामजिक व अन्य क्षेत्रातील सर्वाचा सन्मान ट्रॉफी देऊन ही करण्यात आला. यावेळी माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख,शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, विरशैव लिंगायात समाजाचे अध्यक्ष शुभजीत नष्टे , माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, अविनाश जेऊरकर, अशोकभाऊ घोंगडे, उमेश देशमुख, कल्याण नष्टे, सुरेश घोंगडे विजय सगरे, नामदेवराव देशमुख,वैभव मेथवडे,बंडू स्वामी,भाऊ स्वामी ,महादेव शेटे गुरुजीव समजातील अन्य मान्यवर उपस्थित होते.



## बाबासाहेबांचे विचार उन्नतीसाठी आवश्यक : आठवले

✔ **मोडनिंब :** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार राष्ट्र उन्नतीसाठी आवश्यक असुन ,प्रत्येक भारतीय नागरिकांनी अंमलात आणने ही काळाची गरज आहे. असे विचार रामदास आठवले यांनी व्यक्त केले ते सोलापूर जिल्ह्यातील दौऱ्यावर आले असता कार्यकर्ते यांना संबोधित करताना बोलत होते. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रिय मंत्री रामदासी आठवले साहेब आज सोलापूर दौऱ्यावर आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष पोपट मामा लोंढे वेणेगाव.. रिपब्लिकन पक्षाचे करमाळा तालुका अध्यक्ष अमोल कदम यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी अजित मोरे साहेब.. पवन साहेब.व रिपब्लिकन पक्षाचे सभासद उपस्थित होते.



## डिकसळ सोसायटीच्या चेअरमनपदी शेकापचे गेजगे

✔ **सांगोला :** सांगोला तालुक्यातील डिकसळ येथील वि.का. से.सो.चेअरमन पदी शेकापचे बाबासाहेब साधू गेजगे,तर राष्ट्रवादी चे ,व्हाईस चेअरमन विकास सिद्राम गंगणे ,यांची बिनविरोध निवड करण्यात आली .डिकसळ येथील सोसायटीचे चेअरमन गुंडा सदाशिव पाटील, व्हाईस चेअरमन विठोबा पवार यांनी राजीनामा दिला होता, त्यामुळे ही निवडणूक लागली होती. तरी अध्यक्ष पदासाठी बाबासाहेब गेजगे व व्हाईस चेअरमन पदासाठी विकास गंगणे यांचा अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.यावेळी सोसायटीचे सर्व संचालक आजी,माजी पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दाते प्रशालेची निकिता दडस हिचे एनएमएमएस परीक्षेत यश

✔ **नातेपुते :** येथील डॉ.बाळकृष्ण जयवंत दाते प्रशालेतील कू.



निकिता दडस विद्यार्थ्यांनीस राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या (एनएमएमएस) शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले आहे. ही परीक्षा आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेतली जाते. स्पर्धेत मेरिटमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत प्रत्येक वर्षी राज्य व केंद्र शासनातर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. शिष्यवृत्तीसाठी प्रशालेतील कू. निकिता दडस या विद्यार्थ्यांनीस नववी ते बारावीपर्यंत प्रत्येक वर्षी १२ हजार रुपयांप्रमाणे ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या. विद्यार्थ्यांना ,संजय नाळे, विकास काळे,सारीका जगताप ,वर्गशिक्षक हनूमंत वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मूख्याध्यापक प्रविण बडवे,उपमूख्याध्यापक विठ्ठल पिसे, यांनी अभिनंदन केले.

# नृत्याकडे करिअर म्हणून पहाः सत्यप्रभादेवी

✔ सुराज्य/अकलूज



अकलूज आणि परिसरातील मुला मुलींना १६ एप्रिल ते १ मे या उन्हाळी सुट्टीमध्ये मुंबई पुणे च्या धरतीवर साई सहाराच्या डॉ. श्रद्धा जवंजाळ यांनी हिप हॉप , अर्बन, सेमी क्लासिकल ,बॉलीवूड अँड वेस्टर्न, क्रपं आणि बी बॉइंग भरत नाट्यम , कथक यासह वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य शिबिराच्या माध्यमातून शिकवलीच परंतु या मुला मुलींना नृत्याविष्कारासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले हे कौतुकास्पद गोष्ट आहे. नृत्यप्रकाराकडे आता मुला मुलींनी करिअर म्हणून पहावे असे सत्यप्रभादेवी रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी मत व्यक्त केले.

साई सहारा मेडिकल हेल्थ अँड हेल्थ एज्युकेशनल अॅकेडमी आणि कलामूर्ती डान्स अॅकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने अकलूज येथील स म शंकराव मोहिते पाटील स्मृतीभवन या ठिकाणी या नृत्य शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या यावेळी व्यासपीठावर आ रणजीतसिंह मोहिते पाटील, अकलूजचे माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते पाटील ,डॉ. राहुल जवंजाळ, डॉ. श्रद्धा जवंजाळ ,पोलीस अधिकारी अनुजा पाटील सोलापूर ,गौरी नाईक पुणे ,जयश्री शेलार सातारा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,स्मृती भवन अकलूज येथे साई सहारा मेडिकल हेल्थ अँड एज्युकेशनल अॅकेडमी संचलित कला मूर्ती डान्स अॅकेडमी च्या स्टेप अप व्हॉल्यूम ४ या डान्स व नृत्य प्रकारामुळे अकलूज आणि परिसरातील विद्यार्थ्यांना नवनवीन प्रकारची नृत्य शिकावयास तर मिळालीच परंतु याचबरोबर या नृत्य प्रकारांकडे एक कला म्हणून न पाहता याकडे मुला-मुलींनी करिअर म्हणून पाहिले तरी वावगे ठरणार नाही असेही सांगितले.

स्मृती भवन च्या मंचावर चिमुकल्यासह अनेकांनी यावेळी आपली कला सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी पुणे येथील सुप्रसिद्ध रेडिओ जॉकी आर जे बंड्या एफ एम यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



## पदोन्नती ही स्वामीकृपाच : उपजिल्हाधिकारी अंजली मरोड

✔ सुराज्य/अक्कलकोट

स्वामी समर्थांचे आशीर्वाद माझ्या कुटुंबीयांवर नेहमीच आहेत.स्वामी कृपेने अक्कलकोटला स्वामींच्या पावनभूमीत तहसीलदार पदावरून प्रशासकिय सेवेच्या माध्यमातून जनसेवा करण्याची खूप संधी लाभली.अक्कलकोटला असताना स्वामींच्या मठात नेहमीच येणे जाणे असायचे, त्यामुळे कामाच्या माध्यमातून का होईना स्वामी दर्शनाकरिता बोलून घेत असतात याचा विशेष आनंद होता.

स्वामीकृपा असल्याने जास्त लांब न जाता सोलापूरलाच इतके दिवस प्रशासकिय माध्यमातून विविध पदावरून काम करण्याची संधी मिळाली. आता स्वामी कृपेनेच पदोन्नती होऊन उपजिल्हाधिकारी पदी काम करण्याची संधी लाभल्याने आनंदच आहे. या माध्यमातून बढतीने मिळालेली पदोन्नती ही माझ्यावरील स्वामी कृपाच असल्याचे मनोगत नूतन उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी व्यक्त केले. ते नुकतेच उपजिल्हाधिकारी पदी बढती मिळाल्यानंतर प्रथमच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी अंजली मरोड व त्यांच्या भगिनींचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना मरोड यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, संजय पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

## पिलीव परिसरात वाढत्या तापमानामुळे जनजीवन विस्कळीत

✔ **पिलीव :** सध्या मे महीना सुरु आहे दरवर्षी पेक्षा यंदा तापमानात प्रचंड मोठी वाढ झाली आहे यामुळे जनजिवन विस्कळीत झाले आहे. कधी नव्हे तो मधुन अधुन अवकाळी यामुळे तापमानात झालेला बदल भयानक आहे सकाळपासुनच प्रचंड उष्णता ,उकाडा यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. सकाळी अकरा नंतर च रस्ते ओस पडु लागले आहेत .दुपारी नागरिक उन्हापासून संरक्षण म्हणून झाडांच्या सावलीचा आधार घेत आहेत तर शाळेला सुट्टी असल्याने मुले विहीरीवर कनालवर पोहणयासाठी जात आहे. यामुळे सकाळी अकरापासुन संध्याकाळी सहा - सात वाजेपर्यंत बाजारपेठा अक्षरशः ठप्प होत आहेत. यामुळे सध्या बाजारपेठेत मंदीचे सावट जाणवत आहे. तर इतर हंगामात सकाळ पासून भरणारा मंगळवारचा बाजार सध्या चक्क संध्याकाळी पाचनंतर भरत आहेत.सध्या लाईटचाही लपंडाव आहे सतत लाईट खंडीत होत असल्यामुळें पंखा, कुलर, एसी बंदच आहेत यामुळे अक्षरशः जिवाची काहीली होत असुन कधी नव्हता एवढा उन्हाळा कडक आहे असे सर्व सामान्य नागरिकामधुन बोलले जात आहे. सध्या मे महीना सुरु असला तरी याच महीन्याच्या उत्तराधात पावसाचे पहीले नक्षत्र सुरु होत आहे. यामध्ये कदाचीत पाऊस पडला तर ठिक त्याशिवाय तापमानात बदल होत नाही असे चित्र सध्या आहे पण तोपर्यंत वाढत्या उन्हापासून दिलासा मिळने थोडे कठीणच आहे.

## कारची मोटार सायकलला धडक, एक ठार

✔ **मोहोळ :**इको कारने मोटार सायकलला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण ठार तर एक जण गभीर जखमी झाला हा अपघात यावली शिवारात घडला.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार सुनील सौदागर जाधव व अभिमान अगतराव चेंगगे हे दोहे आपल्या मोटर सायकल क्रं. एम एच १३ सी ए ४२८ या वरून वस्ती कडून यावली गावाकडे हायवे रोड वरून निघाले होते त्यांना पुण्याहून सोलापूर च्या दिशेने भरधाव वेगाने निघालेल्या एको कार एम एच ०२ ए क्यू ३१९३ ने पाठीमागून जोराची धडक दिली यात मोटर सायकल वरचे दोघेही जखमी झाले.अगतराव चेंडगे वय ६८ रा. यावली यांना डोकिस पायास मार लागून गंभीर जखमी होऊन पडले होते सुनील जाधव हेही जखमी झाले होते त्यांना तात्काळ मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले यावेळी उपचारापूर्वी अगतराव चेंगगे वय ६८ हे मयत झाले असल्याचे डॉक्टरांनी संगितले तर सुनील जाधव यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूरला पाठवण्यात आले हा अपघात बुधवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडला याबाबत एको कारचा चालक शौकत ईसाक शेख रा. हवेली जि. पुणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास मोहोळ पोलिस करित आहेत

## यवतमाळ येथील मुलीची हत्या

# आरोपींवर कारवाईसाठी वेळापूर पोलिसांना निवेदन

✔ सुराज्य/वेळापूर





यवतमाळ येथील मातंग समाजातील १६ वर्षीय वर्षा आमटे नावाच्या मुलीवर वाहन मालक सुशिल भांगे याने बलात्कार करुन दि ५ / ५ / २०२३ रोजी डोका ता केज जि बीड येथे तिची हत्या करण्यात आली.

या घटनेच्या निषेधार्थ वेळापूर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासमोर भारतीय दलित महासंघाच्या वतीने धरणे आंदोलन करुन निषेध करण्यात आला.

प्रास्ताविक जिल्हा युवक सरचिटणीस अजितदादा साठे यांनी केले आहे.

यावेळी किरण साठे,दादासाहेब लोखंडे, बाळासाहेब धाईंजे,मिलिंद सरतापे,रजनिश बनसोडे,यांनी ही विचार मांडले.

यावेळी भारतीय दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष दादासाहेब लोखंडे,प म अध्यक्ष महेंद्र साठे,जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ मदने,जिल्हा युवक सरचिटणीस अजितदादा साठे,तालुका अध्यक्ष गणेश खंडागळे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस किरण साठे,कॉंग्रेसचे रघुनाथ साठे,माजी जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, रिपाइंचे अध्यक्ष मिलिंद सरतापे,वेळापुरचे सरपंच रजनिश बनसोडे, अमोल साठे,हनुमंत वायदंडे,गणेश साठे, प्रदीप सरवदे सचिन साठे, राहुल नाईकनवरे, अभिजित साठे, राहुल दनाने,रामभाऊ साठे, अरुण चव्हाण,दत्तात्रय साठे, संदीप साठे,महादेव नाईकनवरे, व समस्त मातंग समाज बांधव उपस्थित होते. याबाबतचे निवेदन वेळापूर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी स्विकारले.

# श्री पांडुरंग पादुका पालखी सोहळ्याचे शुक्रवारी मुक्ताईनगरकडे प्रस्थान

✔ सुराज्य/पंढरपूर

**विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती व श्री संत मुक्ताबाई संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या श्री पांडुरंगराय पादुका पालखी सोहळ्याचे शुक्रवार दि १२ मे रोजी श्री क्षेत्र मुक्ताईनगरकडे प्रस्थान होत असल्याची माहिती श्री संत मुक्ताबाई संस्थानचे अध्यक्ष ड . रवींद्र पाटील यांनी दिली.**



श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र मुक्ताईनगर हा परंपरेने सुरु असलेला पालखी सोहळा श्री संत मुक्ताबाई यांच्या ७२६ व्या अंतर्धान समाधी सोहळ्यासाठी शुक्रवार दि १२ मे रोजी सकाळी ६ वाजता श्री क्षेत्र मुक्ताईनगरकडे प्रस्थान ठेवीत आहे . श्री पांडुरंगराय पादुकांची सकाळी ६ वाजता विधीवत पुजा झाल्यानंतर मंदिरे समितीच्या वतीने मानक-यांचा सन्मान होईल व हा सोहळा श्री क्षेत्र मुक्ताईनगरकडे प्रस्थान ठेवेल .

शुक्रवार दि १२ रोजी सकाळी ९ वाजता करमाळा, दुपारी १ वाजता अहमदनगर, सायंकाळी ४ वाजता नेवासा फाटा मार्गे सायकाळी ७ वाजता औरंगाबाद येथील श्री गजानन महाराज मंदिरात मुक्कामी पोहोचेल .

शनिवार दि .१३ रोजी सकाळी सिल्लोड, दुपारी जामनेर येथे संत नामदेव महाराज पादुका भेट सोहळा , नैवेद्य व भोजन घेवून सायंकाळी कुरापानाचे मार्गे सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल मंदिर, भुसावळ येथे पोहोचेल. येथे संत निवृत्तीनाथ व श्री पांडुरंगराय पादुका भेटीचा सोहळा होईल तर पंढरपूरहुन निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या पादुका मुक्ताईनगर मुक्कामी पोहोचतील.

रविवार दि १४ मे रोजी श्री क्षेत्र कोथळी येथे श्री संत मुक्ताबाई अंतर्धान समाधी सोहळा असून या सोहळ्यासाठी श्री पांडुरंगराय पादुका पालखी सोहळा पोहोचेल. संत मुक्ताबाई अंतर्धान समाधी सोहळ्याच्यानिमित्ताने कीर्तनाची सेवा संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. केशवदास नामदास यांची होईल तर रात्रौ संत निवृत्तीनाथ संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. जयंत महाराज गोसावी यांची कीर्तनाची सेवा होईल.

सोमवार दि. १५ मे रोजी एकादशी निमित्त श्री क्षेत्र कोथळी ते श्री क्षेत्र मुक्ताईनगर दिंडी मिरवणुक होईल. त्यानंतर हा सोहळा श्री क्षेत्र मुक्ताईनगर येथे मुक्कामी विसावेल. मंगळवार दि १६ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ द्वादश पारणे सोहळा होईल आणि त्यानंतर श्री पांडुरंगराय पादुका पालखी सोहळ्याचा परतीचा प्रवास सुरु होईल. मलकापूर, मोताळा , बुलढाणा मार्गे हा सोहळा श्री क्षेत्र चिखली येथील श्री रेणुका माता मंदिरात मुक्कामी पोहोचेल. बुधवार दि. १७ मे रोजी देउळगांवराजा, जालना, अंबड, गेवराई मार्गे बीड मुक्कामी पोहोचेल. बीड येथील श्री हनुमान मंदिरात पालखी सोहळ्याचा मुक्काम आहे.

गुरुवार दि. १८ मे रोजी कुंतलगीरी फाटा, वाशी , बार्शी येथील श्री भगवंत मंदिर, कुर्डुवाडी मार्गे सायंकाळी ६ वाजता हा सोहळा श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचेल. यावेळी पालखी सोहळा प्रमुख रवींद्र महाराज हरणे, सूर्यकांत भिसे आदी उपस्थित होते.

# कर्नाटकात काँग्रेस की भाजप? जेडीएस पुन्हा बनणार किंग मेकर?

कर्नाटक/वृत्तसंस्था

कर्नाटकात अडीच हजाराहून अधिक उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. आता १३ तारखेला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार असून त्याकडे अवघ्या देशाचं लक्ष लागले आहे. सी व्होटरने कर्नाटकचा एक्झिट पोल समोर आणला आहे. सध्याच्या कलावरून असं दिसतंय की काँग्रेस सर्वात मोठा पक्ष असेल पण त्याला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कुमारस्वामी यांचा जेडीएस पक्ष किंगमेकर बनणार का याकडे सर्वाचं लक्ष लागलं आहे.

एक्झिट पोलनुसार, कर्नाटकातील ग्रेटर बेंगळुरू प्रदेशात काँग्रेसला ३९ टक्के मतांसह ११-१५ जागा मिळण्याची अपेक्षा आहे. तर भाजपला ४५ टक्के मतांसह १५-१९ जागा मिळू शकतात. जेडीएसला १३ टक्के मतांसह १-४ जागा मिळतील. दुसरीकडे, ३ टक्के मतांसह ०-१ जागा इतरांच्या खात्यात जात आहेत.

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या यांनी आरोप केला की, भाजपला मनी पॉवर'च्या माध्यमातून निवडणुका जिंकायच्या आहेत कारण त्यांच्याकडे जनतेला दाखवण्यासाठी कोणतेही विकासकाम नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारादरम्यान राज्यातील महागाई आणि बेरोजगारी आणि भ्रष्टाचारावर मौन बाळगल्याचा आरोपही त्यांनी केला. सिद्धरामय्या म्हैसूर जिल्ह्यातील वरुणा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.

**ग्रेटर बंगलोर प्रदेशात कोणाला किती मते मिळण्याची शक्यता? (३२ जागा)**

- भाजप- ४५%
- काँग्रेस - ३९%
- जेडीएस - १३%
- इतर - ३%

**ग्रेटर बंगलोर प्रदेशात कोणाला किती जागा मिळण्याची शक्यता?**

- भाजप-१५-१९ जागा
- काँग्रेस-११-१५ जागा
- जेडीएस -१-४ जागा
- इतर -०-१ जागा

एक्झिट पोलनुसार, कर्नाटकातील ओल्ड म्हैसूर भागात काँग्रेस आणि जेडीएसमध्ये लढत दिसून येत असून भाजप पिछाडीवर असल्याचे दिसत आहे. काँग्रेसला २८-३२ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर भाजपला ०-४ जागा मिळू शकतात. जेडीएसला १९-२३ जागा मिळतील. दुसरीकडे ०-३ जागा अपक्षांच्या खात्यात जाताना दिसत आहेत.

**ओल्ड म्हैसूर प्रदेशात कोणाला किती जागा मिळतील? (५५ जागा)**

- भाजप- ०-४ जागा
- काँग्रेस-२८-३२ जागा
- जेडीएस-१९-२३ जागा
- इतर- ०-३ जागा

**जुन्या म्हैसूर भागात कोणाला किती मते मिळाली?**

- भाजप- २६%
- काँग्रेस- ३८%
- जेडीएस - २९%
- इतर- ७%

एक्झिट पोलनुसार, मध्य कर्नाटक भागात काँग्रेस आणि भाजपमध्ये लढत दिसून येत आहे. काँग्रेसला येथे १८-२२ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर भाजपला १२-१६ जागा मिळू शकतात. जेडीएसला ०-२ जागा मिळताना दिसत आहेत. दुसरीकडे ०-१ जागा इतरांच्या खात्यात जात आहेत.

**मध्य कर्नाटक विभागात कोणाला किती जागा मिळतील? (३५ जागा)**

- भाजप-१२-१६ जागा
- काँग्रेस-१८-२२ जागा
- जेडीएस- ०-२ जागा
- इतर- ०-१ जागा

**मध्य कर्नाटक विभागात कोणाला किती मते मिळाली?**

- भाजप-३९%
- काँग्रेस-४४%
- जेडीएस -१०%
- इतर-७%






## कर्नाटकातील मतदान शेवटच्या टप्प्यात ६५.६९ टक्के मतदान

कर्नाटक/वृत्तसंस्था

कर्नाटकातील निवडणुकीसाठी मतदान आता शेवटच्या टप्प्यात आलं असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६५.६९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून यादरम्यान मतदान मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीचा निकाल १३ मे रोजी लागणार आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी आज दुपारी ३ वाजेपर्यंत ५२.०३ टक्के मतदान झालं होतं. त्यानंतर ५ वाजेपर्यंत ६५.६९ टक्के मतदान झालं. कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीसाठी राजकिय पक्षांनी सुमारे महिनाभर प्रचार केल्यानंतर आता राज्यातील जनता सत्तेच्या चाव्या कुणाकडे देणार हे १३ तारखेला ठरणार आहे. भाजप सत्ता कायम ठेवणार की काँग्रेस सत्तेत येणार हे अवघ्या काही तासांमध्ये ठरणार आहे.

राज्यात मतदानादरम्यान तीन ठिकाणी हिंसाचार झाल्याच्या बातम्याही आल्या आहेत. पोलिस सूत्रांनी सांगितले की, विजयपुरा जिल्ह्यातील बसवना बागेवाडी तालुक्यातील मसाबिनाल गावात एतच् आणि ततझढ (व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल) मशिन बदलल्या जात असल्याची अफवा पसरली. यानंतर संतप्त ग्रामस्थांनी काही ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मशिन्सची नासधूस केली आणि मतदान अधिकाऱ्यांच्या वाहनांचे नुकसान केले. बेंगळुरूच्या पद्मनाभनगर विधानसभा मतदारसंघातील पपई गार्डनमधील मतदान केंद्रावर लाठ्या-काठ्या घेऊन आलेल्या काही तरुणांनी त्यांच्या राजकिय प्रतिस्पर्ध्यांवर हल्ला केला. बेल्लारी जिल्ह्यातील संजीवरायनकोटमध्ये काँग्रेस आणि भाजपचे काही कार्यकर्ते एकमेकांना भिडले. कर्नाटकात सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली, सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान सुरू होते.

**कर्नाटकमध्ये काँग्रेस १३०-१३५ जागा जिंकेल, मल्लिकार्जुन खर्गेंना विश्वास**

कर्नाटकात काँग्रेस सत्तेत येईल अशी शक्यता अनेकांनी व्यक्त केली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही राज्यात १३० ते १३५ जागा जिंकतील असा विश्वास व्यक्त केला आहे. लोकांना हे सरकार बदलायचे आहे.

भ्रष्टाचार हटवून विकास घडवून आणणारे सरकार त्यांना हवे आहे, त्यामुळं काँग्रेस पक्ष सत्तेत यावा असे लोकांना वाटत असल्याचे मत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केले. कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्ष पूर्ण बहुमताने १३०-१३५ जागा जिंकेल असं ते म्हणाले

कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीसाठी होणाऱ्या मतदानासाठी राज्यभरातील एकूण ५८,५४५ मतदान केंद्रांवर मतदान करण्याची सुविधा प्राप्त करुन देण्यात आली आहे. मतदानादरम्यान एकूण %५,६०३ बॅलेट युनिट (इण), %०,३०० कंट्रोल युनिट (उण) आणि %६,२०२ व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (ततझढ) वापरण्यात येणार आहेत.

राज्यभरातील एकूण ५,३१,३३,०५४ मतदार मतदानाचा हक्क बजावू शकणार आहेत. या मतदारांमध्ये २,६७,२८,०५३ पुरुष मतदार तर २,६४,००,०७४ महिला मतदार आहेत. तसेच ४,९२७ इतक्या संख्येने इतर मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. राज्यात ११,७१,५५८ तरुण मतदार आहेत, तर ५,७१,२८१ शारीरिकदृष्ट्या अपंग आहेत आणि १२,१५,९२० मतदार हे ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत.

**२,६१५ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद होणार**

विधानसभा निवडणुकीसाठी एकूण २,६१५ उमेदवार उभे आहेत. त्यामध्ये २,४३० पुरुष तर १८४ महिला उमेदवार आणि एक तृतीयपंथीय उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या सर्व उमेदवारांचे भवितव्य आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान पेटीत बंद होणार आहे.

**सलग दोन वेळा कोणताही पक्ष सत्तेत नाही**

कर्नाटक या राज्याचे वैशिष्ट्य म्हणजे आतापर्यंत इथल्या जनतेने सलग दोन वेळा कोणत्याही राजकीय पक्षाकडे सत्ता सोपवली नाही.

दर पाच वर्षांनी राज्यात सत्ताबदल होतोय. हा समज मोडून काढण्यासाठी भाजपने कंबर कसली असून स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात प्रचारात आघाडी घेतल्याचं दिसून आलं. तर दुसरीकडे काँग्रेसच्या सिद्धरमय्या आणि डीके शिवकुमार या नेत्यांनी तोडीस तोड काम करत प्रचाराचा धडाका लावला. त्यामुळे आता जनता कुणाच्या पाठिशी राहते आणि कुणाला बाजूला सारते हे १३ मे रोजीच्या निकालावेळी समजेल.

## डोनाल्ड ट्रम्प ठरले दोषी; कोर्टाने ठोठावला दंड



सोलापूर : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. न्यायालयाने ट्रम्प यांना लैंगिक शोषण प्रकरणात दोषी ठरवलं आहे. लैंगिक शोषण आणि मानहानीप्रकरणी ट्रम्प यांना पाच दशलक्ष डॉलर्सचा (अंदाजे ४१ कोटी रुपये) दंड ठोठावला आहे. हे प्रकरण १९९० च्या दशकातील असून एका मासिकाच्या लेखिका ई. जीन कॅरोल यांच्या लैंगिक अत्याचाराशी संबंधित आहे. २०२४ च्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी आलेला हा निर्णय डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण ते २०२४ च्या निवडणुकीची तयारी करत होते. यासाठी प्रचारही केला जात होता. असं असताना डोनाल्ड ट्रम्प यांना न्यूयॉर्कमधील न्यायालयाने लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यात दोषी ठरवलं आहे. १९९० च्या दशकात एका मासिकाच्या लेखिका ई. जीन कॅरोलचं लैंगिक शोषण करणं आणि नंतर तिला खोटं' ठरवून तिची बदनामी केल्याचा आरोप ट्रम्प यांच्यावर आहे. मंगळवारी न्यायालयाच्या नऊ सदस्यीय ज्युरीने या प्रकरणात ट्रम्प यांना दोषी ठरवलं.

## महाराष्ट्र सत्तासंघर्षाचा निकाल : सहा याचिका अन् पाच न्यायाधीश

मुंबई : गेल्यावर्षी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले. त्यांच्यासोबत शिवसेनेचे ४० आमदार गेले. भाजपने या आमदारांना साथ दिली. अखेर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. तेव्हापासून सर्वोच्च न्यायालयात एकापोठापाठ एक अशा सहा याचिका दाखल झाल्या. या सहा याचिकांवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी झाली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या घटनापीठासमोर या सहा याचिकांवर मार्च महिन्यात दैनंदिन सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने यावरील निकाल राखून ठेवला. या घटनापीठातील न्या. एम. आर. शाह हे १५ मे रोजी म्हणजेच येत्या सोमवारी निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्याआधीच महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल येईल हे स्पष्ट होते. समलिंगी विवाहाला मान्यता द्यावी की नाही या मुद्यावर सुनावणी सुरु असताना सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी उद्या खूप काम आहे. आम्ही निकाल देणार आहोत, असे वक्तव्य केले. त्यामुळे महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल उद्याच येणार अशी चर्चा सुरु झाली. अखेर न्यायालयाच्या कामकाजाचा बोर्ड संध्याकाळी प्रसिद्ध झाला. त्यात महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल उद्या सकाळी साडेदहा वाजता दिला जाईल असे नमूद होते. त्यामुळे उद्याच निकाल दिला जाईल हे स्पष्ट झाले.

## विद्यार्थिनींना उलटे कपडे आणि अंतर्वस्त्रे घालून परीक्षेला बसवले

सांगली : सांगलीत नीट परीक्षेच्या वेळी चिड आणणारी एक घटना घडल्याची बातमी समोर आली आहे. हा प्रकार विद्यार्थिनींच्या बाबतीत घडला आहे. जेव्हा त्यांनी याबाबत आपल्या पालकांना सांगितलं तेव्हा संतापलेल्या पालकांनी याबाबत थेट तक्रार केली. तक्रार केल्यानंतर नेमकं काय घडलं आहे ते कळलं आहे. नीट परीक्षा सुरु असताना मुलींना कपडे आणि आणि त्यांची अंतर्वस्त्रे उलटी घालायला लावल्याचा हा धक्कादायक प्रकार महाराष्ट्रातल्या सांगलीमध्ये घडला आहे. संपूर्ण देशात ७ मे या दिवशी नीटची परीक्षा पार पडली. सांगलीतली बहुसंख्य विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. मात्र सांगलीतल्या कस्तुरबा वालचंद हे महाविद्यालय ज्या विद्यार्थिनींना केंद्र म्हणून मिळालं त्यांना अत्यंत धक्कादायक प्रकाराला सामोरं जावं लागलं. कस्तुरबा वालचंद या महाविद्यालयात परीक्षा देण्यासाठी ज्या विद्यार्थिनी आल्या होत्या त्यांचे त्यांचे अंगावरचे कपडे आणि अंतर्वस्त्रे दोन्ही उलटे करुन परीधान करण्यास सांगितली. आधी या विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली त्यानंतर त्यांना हे करायला सांगितलं. जे विद्यार्थिनींनी ऐकलं आणि कपडे उलटे घालून परीक्षा दिली.

## 'केरला' विरोधात बोलणे आव्हाडांना महागात पडले

सुराज्य/सोलापूर

'द केरला स्टोरी' चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. पण तरी देखील प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशात तर हा चित्रपट करमुक्त (टॅक्स फ्री) करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. काही राज्यांनी या चित्रपटावर बंदी घातली आहे. राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी या चित्रपटात दाखवण्यात आलेली माहिती खोटी असल्याचा आरोप केला आहे. याबाबतचे ट्वीट करत त्यांनी व्हिडीओच्या माध्यमातून माहिती दिली. पण आता या चित्रपटाच्याविरोधात बोलणे जितेंद्र आव्हाड यांना चांगलेच महागात पडले आहे. कारण या प्रकरणावरून आता त्यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात काही लोकांनी ठाण्याच्या वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आव्हाड यांनी ट्वीट करत याची माहिती दिली. चित्रपटाची बदनामी केली म्हणून




गुन्हा दाखल करण्यात आल्याचे आव्हाड यांनी सांगितले. त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून उछ्ळ्ळ्चे संस्थापक प्रदीप कुरुलकर यांच्याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. जो एका बाईसाठी देश विकतो, तोच पुण्यामध्ये सावरकर व्याख्यानमालेत देशभक्तीचे भाषण देतो, याला आपण काय म्हणाल? असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल होताच त्यांनी याबाबतची माहिती देत ट्वीट करत लिहिले की, चित्रपटाची बदनामी केली म्हणून काही भक्तांनी वर्तकनगर पोलीस स्टेशन येथे माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे आणि गुन्ह्यामध्ये म्हटलं आहे की द केरला स्टोरी या चित्रपटाची जितेंद्र आव्हाड यांनी बदनामी केली. माझा प्रश्न असा आहे की, कुरुलकर या अतिशय महत्वाच्या जागी असलेल्या संशोधकाने या देशाची अत्यंत गुप्त माहिती पाकिस्तानला दिली. तो कोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा, कोणत्या राज्याचा प्रतिनिधी नाही तर तो गद्दार आहे. आता कुरुलकरवर बोललो म्हणजे मी कुठल्या जातीबद्दल बोललो असे होत नाही. किंवा कुठल्या धर्माबद्दल बोललो असे होत नाही. विकृतीला गद्दारीला आणि आतंकवादाला धर्म, जात, पंथ.राज्य .राष्ट्र नसते.

## अदानी - हिंडेनबर्ग वाद; सर्वोच्च न्यायालयाच्या तज्ज्ञ समितीने सादर केला अहवाल

नवी दिल्ली : अदानी समुहावर आरोप करणाऱ्या हिंडनबर्ग अहवालाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने चौकशी अहवाल बंद लिफाफ्यात सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. ८ मे २०२३ रोजी तज्ज्ञ समितीचा अहवाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांच्या खंडपीठासमोर सादर झाला आहे. यावरील पुढील सुनावणी १२ रोजी होणार आहे.

हिंडेनबर्गने केलेल्या आरोपींची सर्व बाजूने तपासणी करुन हा अहवाल सादर झाला आहे का हे कळू शकले नाही. तसेच चौकशीसाठी समितीने अजून काही दिवसांची मुदत मागितली आहे का हेही स्पष्ट होऊ शकले नाही. शुक्रवारी होणाऱ्या सुनावणीत या अहवालाचा तपशील कळण्याची शक्यता आहे.

हिंडनबर्ग आरोपाची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्च महिन्यात माजी न्या. अभय मनोहर सप्रे यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली. ओपी भट्ट, न्यायमूर्ती जेपी देवधर, केव्ही कामथ, नंदन निलेकणी, शेखर सुंदरेसन हे समितीचे इतर सदस्य आहेत. केंद्र सरकार, आर्थिक वैधानिक संस्था, डएइख चेअरपर्सन यांना समितीला तपासात पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. त्यानुसार समितीने चौकशी अहवाल न्यायालयात सादर केला आहे.

हिंडेनबर्गच्या अहवालानंतर अदानी समूहातील कंपन्यांचे शेअर्स ७० टक्क्यांपर्यंत कोसळले होते. त्यामुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. यासंदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना अदानी समूहाच्या स्टॉक रुटसंदर्भातील अस्थिरता बघता भारतीय गुंतवणूकदारांचे हित संरक्षित करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने केंद्र सरकार आणि सेबीला उद्देशून म्हटले होते. तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याच्या प्रस्तावावर आपला कोणताही आक्षेप नसल्याचे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते. त्यानंतर न्यायालयाने तज्ज्ञ समिती स्थापन केली.

सेबीच्या नियमांच्या कलम १९चे उल्लंघन झाले आहे का? याची चोकशी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून सेबीला देण्यात आले होते.या चौकशीसाठी सेबीने न्यायालयाकडून मुदतवाढ मागून घेतली आहे.

## सत्यशोधक परिषदेत वन कायदा रद्द करण्याचा ठराव

धुळे : साक्री येथे सत्यशोधक महिला सभेच्या वतीने घेण्यात आलेल्या महिला परिषदेत आदिवासी विरोधी वन कायदा रद्द करावा, वन्य प्राण्यांपासून संरक्षण मिळावे आणि वन्य प्राण्यांनी पिकांचे नुकसान केल्यास त्याची भरपाई मिळावी यांसह अन्य ठराव मांडण्यात आले.परिषदेच्या अध्यक्षपदी निलाबाई वळवी या होत्या. उद्घाटन साजूबाई गावित यांनी केले.

साजुबाई यांच्यासह परिषदेत कॉम्रेड मेधा थत्ते, प्रतिभा परदेशी, लालाबाई भोये, होमाबाई गावित, लिलाबाई अहिरे ,पवित्राबाई सोनवणे, शांताबाई गावित, जमुनाबाई ठाकरे, स्मिता आंबरे ,लिलाबाई मोरे यांची प्रमुख भाषणे झाली. परिषदेत काही ठराव करण्यात आले.

## जखमांवर मलमपट्टी करत असताना कैद्याने डॉक्टरला भोसकले

सुराज्य/सोलापूर




जखमांवर मलमपट्टी करणाऱ्या महिला डॉक्टरवर कैद्याने धारधार शस्त्राने हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत महिला डॉक्टरचा मृत्यू झाला असून पाच पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत. वंदना दास असं २३ वर्षीय महिला डॉक्टरचं नाव असून संदीप असं आरोपीचं नाव आहे. बुधवारी सकाळी तिरुवनंतपुरममधील कोट्टरकारा तालुक्यात ही घटना घडली.

टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, आरोपी संदीप शिक्षक असून बुधवारी सकाळी त्याचे शेजारी राहणाऱ्या व्यक्तीबरोबर भांडण झाले. या भांडणात संदीप जखमी झाला. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत, संदीपला कोट्टरकारा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले.

यावेळी डॉ. वंदना दास संदीपवर उपचार करत असतानाच त्याने धारधार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. यावेळी पाच पोलीस कर्मचारीसुद्धा जखमी झाले. डॉ. वंदना दास यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, या हल्ल्यानंतर तिरुवनंतपुरममधील डॉक्टरांनी आंदोलनाचा पावित्रा घेतला असून आरोपी विरोधात कडक करावी, अशी मागणी डॉक्टरांच्या संघटनांनी केली आहे.

## उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रीपदाच्या राजीनाम्यावरून मोठा संभ्रम

सुराज्य/बारामती

**राज्यातील सत्तासंघर्षावर सुप्रीम कोर्ट आज निकाल देण्याची शक्यता आहे.असे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण तापलं आहे. कोर्टात आमचाच विजय होणार? असा दावा शिवसेनेच्या दोन्ही गटाकडून होत आहे. आता पण आता उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या राजीनाम्याबाबत मोठी शंका व्यक्त केली जात आहे. एकीकडे सुप्रीम कोर्टाच्या निकालाकडे सर्वांचं लक्ष लागलं असताना आता या मुद्द्यावरून राजकारण रंगण्याची चिन्ह आहेत.**

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आमदारकी आणि मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्याची छायांकित प्रत देण्यास राजभवन कार्यालयाने नकार दिला आहे, माहिती अधिकारातून हे समोर आले आहे.

राज्यात सुरू असलेल्या सत्तासंघर्षाच्या प्रकरणावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फक्त तोंडी मुख्यमंत्री पदाचा व आमदारकीचा राजीनामा दिल्याचे ऐकिवात होते. हा राजीनामा राजभवन कार्यालयात राज्यपाल महोदयांकडे उपलब्ध आहे का? आणि असल्यास त्याची साक्षांकित प्रत मिळावी अशी मागणी बारामती तालुक्यातील सोमेश्वर येथील माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन यादव यांनी केली होती.



यादव यांना सदर माहिती बाबत राज्यपालांचे सचिवालय राजभवन कार्यालयाने सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे व राज्यपाल हे ही यात पक्षकार असल्याने याबाबत कोणतीही माहिती देता येणार नसल्याचा दावा केला आहे.

यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे कारण पुढे करत राजभवन कार्यालयास जाणूनबुजून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्याबाबत माहिती उपलब्ध करायचा नाही की वास्तविक त्यांचेकडे असा कोणता राजीनामाच उपलब्धच नाही? असा प्रश्न यादव यांनी उपस्थित केला आहे.

यापूर्वी मराठा आरक्षण व धनगर आरक्षणाबाबत यादव यांनी माहिती अधिकारात माहिती मागविली होती. मात्र त्यावेळेस राज्य सरकाराने सदर बाब न्यायप्रविष्ठ असताना देखील दोन्ही प्रकरणात माहिती उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे नेमके या प्रकरणात न्यायप्रविष्ठ असल्याचे कारण पुढे करून कोणाच्या दबावामुळे सदरची माहिती देण्यास नाकारली जात आहे, हा चौकशीचा भाग असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन यादव यांनी सांगितले.

# रामराजेंना दिल्लीत पाठवा; जयंत पाटलांचे सूचक वक्तव्य

सुराज्य/सोलापूर

**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी एक वर्षाचा कालावधी उरला आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने मोर्चेबांधणी सुरु असून पश्चिम महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदार निवडून आणण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे प्रयत्न सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांना माढा मतदारसंघावर विशेष लक्ष दिले आहे. माढा मतदरसंघाचे प्रतिनिधीत्व भाजपचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर करत आहेत. त्यांच्या विरोधात रामराजे निंबाळकर राष्ट्रवादीचे उमेदवार असण्याचे संकेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले आहेत. फलटण येथील कार्यक्रमात त्यांनी रामराजेंना आता दिल्लीत पाठवा असे सूचक वक्तव्य केल्याने ही चर्चा सुरू झाली आहे.**



फलटणमध्ये रामराजेंच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्कार कार्यक्रमात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रामराजेंना दिल्लीला पाठवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. याबाबत आपण सर्वांनी शरद पवार यांच्याकडे तशी आग्रही मागणी केली तर ते नक्की ऐकतील, असेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे माढा मतदारसंघासाठी रामराजे हेच राष्ट्रवादीचे उमेदवार असणार, हे निश्चित मानले जात आहे.

## ■ माढ्यात भाजपच्या निंबाळकरांविरोधात राष्ट्रवादीचे निंबाळकर?

पूर्वीचा पंढरपूर आणि मतदारसंघ पुनर्रचनेत २००९ मध्ये माढा लोकसभा मतदारसंघाची निर्मिती झाली. पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी तेथून निवडणूक लढवली आणि ते विजयी झाले. २०१४ मध्ये या मतदारसंघातून राष्ट्रवादीने माजी मंत्री विजयसिंह मोहिते - पाटील यांना उमेदवारी दिली. तर भाजपाने ही जागा स्वाभिमानी पक्षाला सोडून तेथे सदाभाऊ खोत यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकित विजयसिंह मोहिते - पाटील यांचे बंधू कै. प्रतापसिंह मोहिते - पाटील



हे अपक्ष लढले होते. २०१४ मध्ये देशात नरेंद्र मोदी यांची लाट असताना माढा मतदारसंघाचा गड राष्ट्रवादीने राखला होता. विजयसिंह मोहिते-पाटील २५ हजार मतांनी निवडून आले होते. २०१९ मध्ये मात्र, विजयसिंह मोहिते - पाटील यांनी भाजपचा रस्ता धरला. त्यावेळी राष्ट्रवादीने संजयमामा शिंदे यांना उमेदवारी दिली. तर भाजपकडून रणजितसिंह नाईक - निंबाळकर यांना उमेदवारी दिली. मात्र, यावेळी मोहिते - पाटलांची साथ न मिळाल्याने हा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या ताब्यातून भाजपकडे आला. आता हा मतदारसंघ पुन्हा मिळवण्यासाठी राष्ट्रवादीने ताकद लावली आहे.

रणजितसिंह नाईक - निंबाळकर यांना शह देण्यासाठी फलटण संस्थानातील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक - निंबाळकर यांना निवडणूक रिंगणात उतरविण्याची तयारी केली आहे. फलटणच्या कार्यक्रमात जयंत पाटील यांनी तसे संकेत दिले आहेत.

**रामराजेंच्या भूमिकेकडे लक्ष :** जयंत पाटील यांनी आपण सर्वांनी रामराजेंना उमेदवारी द्यावी अशी मागणी शरद पवार यांच्याकडे केली तर ते नक्की ऐकतील, असेही स्पष्ट केले. सर्वांच्या मागणीवर पवार हे देखील रामराजेंच्या नावाला दुजोरा देतील. पण, रामराजेंकडून याला मान्यता मिळणे महत्वाचे आहे. तसे झाल्यास खासदार रणजितसिंह नाईक - निंबाळकर यांच्यापुढे आगामी निवडणुकीत रामराजेंचे आव्हान असेल.

# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उद्या सोलापूर दौऱ्यावर

## 'महाबैठक' घेऊन कार्यकर्त्यांना करणार मार्गदर्शन

**सोलापूर** :भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी १२ रोजी सोलापूर दौऱ्यावर आहेत. शहर जिल्हा भाजपतर्फे आयोजित महाबैठकीस बावनकुळे संबोधित करणार आहेत.

सायंकाळी ५ वाजता हेरिटेज मंगल कार्यालयात शहर जिल्हा भाजपची महाबैठक होणार आहे. यावेळी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. रणजीतसिंह मोहिते - पाटील, माजी आ. प्रशांत परिचारक, आ. राजेंद्र राऊत, आ. राम सातपुते, आ. समाधान आवताडे, जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे.



महाबैठकीत पक्षाच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेऊन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय शुक्रवारी सकाळी ११ वाजता प्र बावनकुळे यांच्या हस्ते बलिदान चौक येथे युवा वॉरियर शाखेचे उद्घाटन होणार आहे. तर सकाळी ११.४५ वाजता शिवस्मारक सभागृहात सामाजिक एकत्रीकरण बैठक, दुपारी १२.४५ वाजता विजयपूर रस्त्यावरील इंदिरा सभागृह येथील आदर्श बूथला भेट, दुपारी १.४५ वाजता व्यापारी उद्योजकांसह आयएमए हॉल येथे भोजन, दुपारी ४.३० वाजता हेरिटेज लॉन येथे सोशल मीडिया बैठक, सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या महाबैठकीनंतर सायंकाळी शहर व ग्रामीण कोअर कमिटीची बैठक हेरिटेज लॉन येथे होईल.

यावेळी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी आणि शहर अध्यक्ष विक्रम देशमुख यांनी केले आहे.

# पटवर्धन कुरोली भीमा नदीवर नवीन पूल उभारण्यासाठी प्रयत्नशील : आ.बबनदादा

## पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**पंढरपूर** : नवीन पाणीपुरवठा योजनेमुळे पटवर्धन कुरोली गावासह वाड्यावास्तवरील एकही कुटुंब स्वछ पाण्यापासून वंचित राहणार नसून बंद पाईपलाईन व नळाद्वारे घरोघरी शुद्ध पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांना त्याचा फायदा होईल. पटवर्धन कुरोली भीमा नदीवर वाहतूकीसाठी स्वतंत्र पूल उभारण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही आ बबनराव शिंदे यांनी दिली.



जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजने अंतर्गत पटवर्धन कुरोली (ता. पंढरपूर) येथे ८४ लाख रुपय खर्चाच्या योजनेचे भूमिपूजन आ बबनराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहन उपासे होते यावेळी विठ्ठलचे माजी संचालक उत्तम नाईकनवरे, नंदकुमार पाटील, पोपट चव्हाण, श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष मोहन अनपट, घनशाम काटकर, धैर्यशील नाईकनवरे, सरपंच प्रियांका नाईकणावरे, उपसरपंच शैलजा तवटे, माजी सरपंच गणेश उपासे, ऍड पांडुरंग नाईकणावरे, विष्णू मोरे, भागवत उपासे, पंढीत तवटे, धर्मारज काटकर, दीपक पाटील, दादा साखरे, शाखा अभियंता साई देशमुख ग्रामविकास अधिकारी चंद्रशेखर गिड्डे, दादा तोडकरी. प्रशांत मोरे, शिवाजी नाईकणावरे आदी उपस्थित होते.

**गेल्या काही महिन्यांपासून शेतीच्या विजेच्या तक्रारी आहेत. शेतकरी उपोषणाला ही बसले आहेत. त्याचा विचार करून एमएसईबीची क्षमता वाढवून स्वतंत्र लाईन टाकण्यात येईल. कनॉल पट्टी रस्त्याच्या कामासाठी निधी दिला जाईल, उसाच्या समस्या दूर करून चांगला भाव देण्यासाठी प्रयत्न करून शेतकऱ्यांच्या सर्व समस्या सोडवू, असे आ. शिंदे यांनी सांगितले.**

जुनी ४० वर्षांपूर्वीची योजना खराब झाल्यामुळे काही ठिकाणी पाण्याच्या समस्या निर्माण होत होत्या. आता नवीन होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेमुळे स्वतंत्र पाईपलाईन टाकून घरोघरी व वाड्यावस्त्यांवर शुद्ध पाणीपुरवठा केला जाणार आहे. यासाठी गावातील कोंक्रेट रस्ते फोडावे लागतील मात्र ते पुन्हा नव्याने बनविले जातील. काम करणाऱ्या थेकेदारांकडून कामाचा दर्जा राखला जाईल याची खबरदारी ग्रामपंचायतीने घ्यावी असे आ. शिंदे यांनी सांगितले. यावेळी माजी उपसरपंच पांडुरंग नाईकनवरे यांनी उर्वरित रस्त्यांसाठी निधी द्यावा आशी मागणी केली प्रस्ताविक ॲड. पांडुरंग नाईकनवरे यांनी केले सूत्रसंचालन सुग्रीव कोळी यांनी केले तर आभार गणेश पिंजारी यांनी मानले.



# कॉंग्रेस विरोधात सोलापूर शहर बजरंग दलाचे आंदोलन

## बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर** : बजरंगदल आणि विश्व हिंदू परिषद या संघटनांची काँग्रेस सारख्या पक्षाकडून अतिरेकी संघटनांशी तुलना करून जाणीवपूर्वक बदनामी केली जात आहे, याचा निषेध तसेच बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी बजरंग दलाच्यावतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हा परिषदेच्या पूनम गेटसमोर आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कर्नाटक राज्यातील निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाने बजरंग दलाची तुलना पी.एफ. आय. सारख्या देशद्रोही , आतंकवादी आणि प्रतिबंधित असलेल्या संघटनेशी करून स्वत:च्या राजकिय स्वार्थापोटी बहुमताने निवडून आल्यास आम्ही बजरंग दलावर बंदी घालू असा उल्लेख जाहीरनाम्यात करून लाखो हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि सकल हिंदू बांधवांच्या भावना दुखवण्याचे कारस्थान केले आहे. याचा निषेध करण्यासाठी बुधवारी सकल हिंदू बांधव आणि बजरंग दल यांच्यावतीने आंदोलन करून काँग्रेसचा निषेध केला आहे. यावेळी काँग्रेसच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी बजरंग दलाचे जिल्हा संयोजक दिपक मुथ्या, शहर संयोजक नागेश बंडी, सतीष आनंदकर यांच्यासह आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाई छन्नुसिंग चंदेले स्मृती केंद्रातर्फे कला महोत्सवाचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

गेली ३६ वर्षे सोलापूरात ज्वलंत सामाजिक, राजकीय विषयांवर दिग्गज विचारवंतांची व्याख्याने भाई छन्नुसिंग चंदेले स्मृती केंद्राने आयोजित करीत प्रबोधन चळवळ चालविली. आता व्याख्यानांबरोबरच कलेच्या माध्यमातूनही पुढे वाटचाल करण्याचे संस्थेने ठरविले असून परिवर्तन, जळगाव या संस्थेचा कला महोत्सव सोलापूर येथे आयोजित केला आहे.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यात सध्या परिवर्तनचे महोत्सव होत आहेत. हा दोन दिवसीय महोत्सव १३ व १४ मे २०२३ रोजी हुतात्मा स्मारक मंदिर येथे होणार आहे. महोत्सवाची सुरवात जगप्रसिद्ध भारतीय लेखिका अमृता प्रीतम यांच्या जीवनावर आधारीत आणि हिंदी सिनेमा सृष्टीतील थोर गीतकार साहीर लुधियानवी तसेच चित्रकार इमरोज या तिघांच्या नात्यावर आधारित अमृता साहिर इमरोज या नाटय प्रयोगाने होणार आहे. शंभू पाटील लिखित आणि मंजुषा भिडे दिग्दर्शित या नाटकाचा २२ वा प्रयोग सोलापूरात होत आहे. हे नाटक सध्या मराठी रंगभूमीवर गाजत आहे. महोत्सवाचा समारोप बहिणाबाईंच्या काव्यावर आधारित अरे संसार संसार या गाण्यांच्या आणि कवितेच्या सांगीतिक कार्यक्रमाने होणार आहे. आपल्या साध्या सोप्या शब्दातून जगाला तत्वज्ञान सांगणा-या या कवयित्रीच्या कवितेतील वेगळेपण मांडणारा हा कार्यक्रम आहे. अस्सल खान्देशी असणाऱ्या बहिणाबाईंना खान्देशचे कलावंत उलगडून दाखवणार आहेत. दोन दिवसीय महोत्सव सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे रोज सांय ६ वाजता होणार आहे. हा महोत्सव सर्वांसाठी मोफत प्रवेश असून सोलापूरकर रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन हेमू चंदेले, रवींद्र मोकाशी, प्रा.विलास बेत, डॉ श्रीकांत नारकर, ॲड. सरिता मोकाशी, प्रा. डॉ. रोझा चंदेले-पराशर यांनी केले आहे.

# आता परवान्यासाठी कर विभागाच्या ना हरकत पत्राची आवश्यकता

सुराज्य/सोलापूर

बांधकामसह कोणत्याही प्रकारचे परवान्यासाठी आता महापालिकेने मिळकत कर विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता प्रत्येकाला प्रथम आपला मिळकत कर भरावाच लागणार आहे. सोलापूर महापालिकेकडून विविध प्रकारचे परवाने देण्यात येतात.



यामध्ये बांधकामसह इतर परवान्यांचा समावेश आहे. सोलापूर महापालिका मिळकत कर विभागाकडील थकबाकी नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय आता कोणत्याही प्रकारचे परवाने मिळणार नाहीत.सोलापूर शहरातील सर्वच मिळकतदारांनी आपला मिळकत कर महापालिकेकडे भरणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिका प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

**अन्यथा संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई : पोळ**
महापालिका मिळकत कर विभागाच्या ना हरकत पत्राशिवाय कर्मचारी अथवा अधिकाऱ्यांनी बांधकामसह इतर परवाने निष्काळजीपणाने दिल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही उपायुक्त विद्या पोळ यांनी स्पष्ट केले आहे.

यापूर्वी बांधकाम परवाना घेत असताना संबंधित विकासकांच्या नावावरील मिळकत कर ना हरकत पत्र घेण्यात येत होते मात्र आता तसे न करता ज्या जागेवर नव्याने बांधकाम करण्यात येणार आहे. त्याच जागेवरील मिळकत कर ना हरकत पत्र आता घ्यावे लागणार आहे. त्याशिवाय हे परवाने मिळणार नाहीत, असेही महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

**सोलापूर** : मी तुझ्याशी लग्न करतो असे सांगून पीडित महिलेला पळवून नेऊन उमरगा शिवारात अत्याचार करत नंतर लग्नास नकार दिल्याप्रकरणी तरुणावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुनील दुर्गप्पा कोळी (रा.उमरगा, उस्मानाबाद) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पीडित महिलेची एप्रिल महिन्यामध्ये एका तरुणाशी विवाह झाला होता.तिचे लग्नापूर्वी आरोपीशी ओळख होती.त्या तरुणाने म्हणजेच आरोपी सुनील कोळी याने पीडितेला लग्नानंतर मी तुझ्यासोबत लग्न करतो,तुला चांगले सुखी ठेवतो असे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर आरोपीने आपण लवकर लग्न करू असे सांगून पीडितेला आई वडिलांकडे पाठविले.पण आई वडिलांनी पीडितेला घरात न घेतल्याने पीडिता पुन्हा आरोपीच्या घरी गेली.त्यानंतर आरोपीने लग्नास नकार दिला.याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपी सुनील कोळी याच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## शहरातून पुन्हा दोन दुचाकी पळवल्या

**सोलापूर** : दुचाकी चोरींची मालिका सुरूच असून,बुधवारी शहरातील फौजदार चावडी आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आले आहे.पहिली घटना ही लोकमंगल बँक सावरकर मैदान किल्ला बगीचा जवळ घडली. पुरुषोत्तम ज्ञानेश्वर शिंदे (वय-५०,रा. शिवरत्न शेटे नगर,जुळे सोलापूर) यांची एमएच.१३.बीयु.७११२ ही चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो.हे. पोळ हे करीत आहेत. दुसरी घटना ही हॉटेल सदाशिव येथील बोळकुटे नगर येथे घडली. शरणाप्पा मल्लिकार्जुन दुधणीकर (वय-५४,रा.वीरशैव नगर,विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या जवळ) यांची दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पो.हे.कॉ. शेख हे करीत आहेत.

## पैशासाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर** : लग्नात तुझ्या आई-वडिलांनी आम्हाला मनाप्रमाणे हुंडा दिला नाही व प्लॉट घेण्यासाठी ३६ लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुबीना अनिस अहमद (वय-३५,रा.गुरु राघवेंद्र नगर,मुळेगाव रोड) हिने फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून पती अनिस अहमद, सासू खुर्शीदबेगम अहमद,नणंद शबाना अहमद,दिर फेरोज अहमद (सर्व.सुमैय्या सोसायटी, मजरेवाडी भाग-३) व अमजद अहमद (रा.अमहदरा,हैदाबाद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना दि.२७ जून २०१४ ते २९ एप्रिल २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. तपास पो. हे.कॉ. पवार हे करीत आहेत.


## सालगडी घेऊन जाण्यास प्रतिबंध करण्यावरून मारहाण

**सोलापूर** : सालगडी घेऊन जाण्यास का प्रतिबंध करतो असा जाब विचारणाऱ्या अनिल रामचंद्र चंडक (वय-६२,रा.मोदी) यांना पाच जणांविरूद्ध विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आहे. अनिल हे त्यांच्या पत्नीसह व मुलाचे मित्र पंकित पटेल सचिन रुपनर,सुरज शिकारे,भागीरथी रुपनर पुंडलिक रुपनर (सर्व.रा.चंडक मळा,विजापूर रोड) यांनी मारहाण केली.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सोनार हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याने चार मोबाईल पळवले

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने २९ हजार रुपये किमतीचे एकूण चार मोबाईल चोरून नेले आहे.याबाबत मोहम्मद शेख यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे. ही घटना ९ एप्रिल रोजी दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या दरम्यान कवठे रोड येथील महमद रफीक अब्दुल शेख (वय-१९,रा.सर्वसुखी नगर,लिमयेवाडी) कवठे रोड येथील यांचे मामा अजमोद्दीन यांच्या शेतातील विहीर जवळ घडली तपास पो.हे.कॉ. उपासे हे करीत आहेत.

भावपूर्ण श्रद्धांजली
द्वितीय पुण्यस्मरण



कै.शरणप्पा बसवंतराव पाटील
माजी पोलीस पाटील, बणजगोळ
मृत्यू दि.११/०५/२०२१

कष्टातून संसार फुलविला,
उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला,
आजही तुमची वाट पाहती,
यावे पुन्हा जन्माला...

शोकाकुल
संस्थापक अध्यक्ष : श्री शिव-बसव तरुण मित्र मंडळ, बणजगोळ
श्री मल्लिकार्जुन तरुण मित्रमंडळ, बणजगोळ
महाराजा टुर्स अँन्ड ट्रॅव्हल्स्, अक्कलकोट

## रेडिमेड शिलाई कामगारांचा मेळावा

# माझा मुडदा पडला तरी चालेल पण कामगाराला बेकार होऊ देणार नाही : आडम मास्तर

**सोलापूर** : महाराष्ट्र राज्य सरकार राज्यातील अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित जिल्हा परिषद, महानगरपालिका शाळांच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्यभर एक समान, समानरंगी गणवेश खरेदी करून वितरीत करण्याचा विचाराधीन आहे.

यामुळे गणवेश शिलाई व रेडीमेड व्यवसायातील छोटे-मोठे कारखानदार मिळून सोलापूर जिल्ह्यातील ३० ते ४० हजार कामगार एकाक्षणात बेरोजगार होतील. माझा मुडदा पडला तरी चालेल पण रेडिमेड शिलाई कामगारांना बेकार होऊ देणार नाही असा निर्धार ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांनी केला.

हुतात्मा रेडिमेड शिलाई कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने बुधवार दिनांक १० मे रोजी दत्त नगर येथील लाल बावटा कार्यालय येथे रेडिमेड शिलाई कामगारांचा मेळावा विरेंद्र पद्मा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी आडम मास्तर बोलत होते.

आडम मास्तर पुढे म्हणाले की, दरवर्षी स्थानिक पातळीवर शालेय व्यवस्थापन समिती मार्फत शाळा, पालक आणि विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नेमक्या मापाचे गणवेश शिववून घेतले जातात. सोलापूर





जिल्ह्यातील जवळपास घरगुती छोटे मोठे १ हजार कारखानदार व जेमतेम ३० हजार कामगारांची उपजीविका या गणवेश शिलाईवर अवलंबून आहे. यामध्ये साधारणतः १० हजारांच्या घरात महिला कामगार आहेत. त्यांचाही रोजगार बुडाला तर महिला कामगारांची प्रचंड दैना होईल. सरकारने एक समान, समानरंगी गणवेश खरेदीचा निर्णय घेतल्यास आक्रमक लढाई च्या पवित्र्यात उतरू याबाबतचे निवेदन सुद्धा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, उद्योग व वस्त्रोद्योग मंत्री, शिक्षण मंत्र्यांना पाठवल्याचे आडम मास्तर म्हणाले. तत्पूर्वी एम.एच.शेख यांनी रेडिमेड शिलाई कामगारांच्या समस्यांबाबत आंदोलनाची तयारी करा. आपल्यावर आलेल्या संकटाशी आपण सामना करू शकतो असे प्रतिपादन केले. यावेळी सिटू राज्य महासचिव ॲड.एम. एच.शेख, ॲड.अनिल वासम, संदीप रेउरे, बाळकृष्ण मल्याळ आदी उपस्थित होते.